नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

## शरद पवारांनी मानले नरेंद्र मोदींचे आभार

■ **वृत्तसंस्था, अहिल्यानगर, दि. ११ :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटण्यासाठी सुप्रिया सुळे गेल्या असता, मोदींनी शरद पवार यांच्या तब्येतीची विचारपूस केली असल्याची माहिती समोर आली होती. पंतप्रधानांनी माझ्या तब्येतीची विचारपूस केल्याबद्दल मी त्यांचा आभारी असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे.

या संदर्भात शरद पवार यांनी दोनच शब्दात पंतप्रधानांनी केलेल्या चौकशी बद्दल आभार मानले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या काल झालेल्या वर्धापन दिन मेळाव्यानंतर शरद पवार आज अहिल्या नगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. या दरम्यान त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मी त्यांचा 'आभारी आहे' असे म्हणत शरद पवार यांनी मोदी यांचे आभार मानलेत.

* वर्ष ५१ * अंक ३४६ * * अकोला * गुरुवार, दिनांक १२ जून २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

### खरीखरी..

## रेल्वेचे २४ तास

भारतीय रेल्वेने गेल्या काही काळापासून कात टाकलेली आहे. नवनवीन गाड्या सुरू झालेल्या आहेत. त्यामध्ये वंदेभारत ही वेगवान गाडी आता चांगलीच लोकप्रिय होत आहे. या प्रकारच्या गाड्यांच्या डब्यात चांगल्या सुधारणा झालेल्या आहेत. प्रवाशांनी तक्रार केल्यावर लगेच प्रतिसाद मिळतो. अनेक ठिकाणचे अंतर कमी वेळात पार होते. थोडक्यात आपल्या देशातील रेल्वेचे जाळे अत्याधुनिक रितीने चालवण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. गेल्या काही वर्षात रेल्वेच्या पॅसेंजर गाड्या मोठ्या प्रमाणात कमी झालेल्या आहेत. सर्वसामान्य जनता या गाड्यांचा उपयोग करून प्रवास करण्यामध्ये आघाडीवर होती. या पॅसेंजर गाडीची तिकिटे अत्यंत म्हणजे अत्यंत कमी किमतीत मिळत असत. या गाड्या सर्व स्थानकावर थांबत असत. त्यात रिझर्वेशनची काहीच भानगड नसे. रेल्वेने या प्रकारच्या अनेक लोकप्रिय गाड्या बंद करून टाकल्यामुळे लहान गावातील रेल्वेची स्थानके अगदी ओकी-बोकी झालेली आहेत. संपूर्ण भारतातील कितीतरी पॅसेंजर गाड्या बंद झाल्यामुळे कमी अंतरावर जाण्यासाठी जी सुविधा उपलब्ध होती. ती आता जवळजवळ बंद झालेली आहे. पण ज्या प्रमाणात अत्याधुनिक गाड्या वेगवेगळ्या मार्गावर सुरू करण्यात आलेल्या आहेत. त्याची परिणीती या गाड्या बंद होण्यातच होईल, हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही. एकूणच रेल्वेच्या वेगापासून ते खाना-पानापर्यंतची माहिती हल्ली सहज उपलब्ध होत असते. आतापर्यंत रिझर्व केलेल्या म्हणजेच आरक्षित केलेल्या तिकिटांची माहिती चार तासांपूर्वी जाहीर करण्यात येत होती. तोपर्यंत ज्यांची तिकिटे वेटिंग लिस्टवर असायची. जे वेटिंग लिस्टवर असायचे. त्यांच्या मनाची धाकधूक प्रचंड वाढत असे. केवळ चार तासाच्या वेळात दुसरी काही पर्यायी व्यवस्था करणे शक्यच नव्हते. त्यामुळे पूर्ण पैसे भरून प्रवाशांना चोरासारखा प्रवास करावा लागत होता. आता नुकताच रेल्वे कडून एक निर्णय झाल्याची बातमी आलेली आहे. त्यामध्ये रिझर्वेशन नसल्यास जबर दंड करण्यात येईल असे ठरलेले आहे. या सर्व खटाटोपामध्ये रेल्वेने आता आरक्षण यादी प्रवासापूर्वी २४ तास जाहीर करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे प्रवाशांना पर्यायी व्यवस्था करणे सुलभ होणार आहे. दुसऱ्या गाडीची तत्काळ तिकिटे घेणे किंवा इतर काही व्यवस्था करणे. शक्य होऊन प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. दिवसेंदिवस आपली भारतीय रेल्वे प्रवाशांभिमुख होत आहे. रेल्वेच्या २४ तासांच्या निर्णयाचे आपण स्वागत केले पाहिजे. त्यामुळे प्रवाशांची धावाधाव थांबेल आणि रेल्वेचे आरक्षण नसलेल्या प्रवाशांची गर्दीही कमी होईल. हा त्यामधील फायदा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## मराठा समाजाच्या एसईबीसी आरक्षणाला
# स्थगिती नाहीच!

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ११ :**

राज्य सरकारने मराठा समाजाला एसईबीसी कायद्याअंतर्गत १० टक्के आरक्षण दिले होते. हे आरक्षण सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक प्रवेशांमध्ये देण्यात आले.

मात्र, या निर्णयाविरोधात उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. त्याचबरोबर, आरक्षणाच्या समर्थनार्थही काही याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. आज मराठा आरक्षणासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. या सुनावणीत दोन्ही बाजूंनी वकिलांनी आपले युक्तिवाद मांडले.

सुप्रीम कोर्टाने मे महिन्यात मुंबई उच्च न्यायालयाला मराठा आरक्षणासंबंधी दाखल सर्व याचिकांवर सुनावणी घेण्याचे निर्देश दिले होते. या याचिकांमुळे उच्च शिक्षणात मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना आरक्षण मिळण्यात अडथळे निर्माण झाले आहेत. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या वैधतेबाबत नव्याने सुनावणी आजपासून मुंबई उच्च न्यायालयात सुरू झाली आहे. आता हे आरक्षण कायद्याने मान्य ठरेल की नाही, याचा अंतिम निर्णय या सुनावणीतून होणार आहे.

मराठा आरक्षण प्रकरणावर मुंबई उच्च न्यायालयात विशेष त्रिसदस्यीय पूर्णपीठ, ज्यामध्ये न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठ आहे, सुनावणी घेत आहेत. सुनावणीच्या सुरुवातीला, हे प्रकरण तात्पुरत्या दिलास्यासाठी घ्यायचे की अंतिम निर्णयासाठी घ्यायचे, यावर वकिलांमध्ये आणि न्यायमूर्तींमध्ये युक्तिवाद झाला.

विरोधी वकिलांनी जोपर्यंत अंतिम निर्णय होत नाही, तोपर्यंत अंतरिम स्थगिती द्यावी, अशी मागणी केली. त्यानंतर, सरकारी वकिलांनी हे प्रकरण थेट अंतिम सुनावणीसाठीच घेतले जावे, असा युक्तिवाद मांडला.

मराठा आरक्षणाच्या सुनावणीबाबत बोलताना महाराष्ट्राचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणाला आधीच अंतरिम दिलासा आहे. मग पून्हा सुनावणी घेण्यात अर्थ नाही, आता अंतिम सुनावणीला सुरूवात करायला हवी. यानंतर न्यायमूर्तींनी म्हटले की, मराठा आरक्षणाच्या विरोधात अनेक याचिका आहेत. त्यामुळे आपण सर्वांनी एकत्र बसून विरोधकांची बाजू नेमके कोण मांडणार हे ठरवा.

यावर विरोधी वकिल प्रदीप संचेती यांनी म्हटले की, प्रत्येक याचिकाकर्त्याने विविध विषय वाटून घेतले आहे. प्रत्येकाला आपले मत मांडायचे आहे. त्यामुळे प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार द्यायला हवा.

यानंतर न्यायाधिश घुगे यांनी, मराठी आरक्षणाची पुढील सुनावणी १८ तारखेला ३ वाजता आणि १९ जूलै २०२५ रोजी पुर्ण दिवस चालेल अशी माहिती दिली. त्यानंतर १९ जुलैला पुढची तारीख जाहीर केली जाणार आहे. आज मराठा समजाच्या एसईबीसी आरक्षणवर कुठलीही स्थगिती नाही, त्यामुळे मराठा विद्यार्थ्यानां एसईबीसी एडमिशनचा मार्ग मोकळा झाला आहे. आता पुढ़ील सुनावणी पुढ़िल महिन्यत १८-१९ जुलैला होणार आहे.

## नागपूरमध्ये मोबाइल मेडिकल युनिट्सद्वारे
## मोफत आरोग्य सेवा सुरू

मुख्यमंत्री फडणवीस यांचा पुढाकार



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ११ :**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर शहरातील दुर्लक्षित भागांतील नागरिकांसाठी एक दिलासादायक आरोग्य सेवा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

यासाठी सॅनोफी इंडिया लिमिटेड, नागपूर महानगरपालिका आणि पिरामल स्वास्थ्य व्यवस्थापन व संशोधन संस्था (पीएसएमआरआय) यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार होऊन दोन मोबाइल मेडिकल युनिट्स (एमएमयू) कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

हा उपक्रम सॅनोफीच्या सामाजिक उत्तरदायित्व (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी -सीएसआर) कार्यक्रमांतर्गत राबविला जात आहे.

नागपूरमधील ३० वर्षांवरील सुमारे दोन लाख नागरिकांना या माध्यमातून मोफत प्राथमिक आरोग्यसेवा मिळणार आहे. विशेषतः मधुमेह, उच्च रक्तदाब व तोंडाचा कर्करोग यांसारख्या असंसर्गजन्य आजारांचे वेळीच निदान करून आवश्यक उपचार अथवा पुढील रुग्णालयीन सेवेसाठी रुग्णांना पाठविणे हे या युनिट्सचे मुख्य उद्दिष्ट आहे.

ही मोबाइल युनिट्स शहरातील आझाद कॉलनी, बडा ताज, बीडी पेठ, बिनाकी, छोटा जात, धंतेश्वरी नगर, धरम पेठ, डॉ. आंबेडकर नगर, एकात्मता नगर, गिट्टीखदान, गोपाल नगर, जैताळा, जयंती नगर, महात्मा फुले चौक, नंदनवन, पाचपोळी आदी विविध भागातील मार्गावर कार्यरत असून, नागरी गरीब व वंचित समाजघटकांपर्यंत सातत्याने आरोग्यसेवा पोहोचवली जात आहे. यासोबतच आरोग्य विषयक जनजागृती, जीवनशैली सुधारणा आणि व्यसनमुक्ती सल्ला सेवा यांचा समावेश देखील या उपक्रमात करण्यात आला आहे.

हा उपक्रम राज्य शासनाच्या सर्वसमावेशक व सुलभ आरोग्यसेवा प्रदान करण्याच्या दृष्टिकोनाशी सुसंगत असून, नागपूर महानगरपालिकेच्या सहकार्यामुळेच या सेवांची प्रभावी अंमलबजावणी शक्य झाली आहे. भविष्यात या उपक्रमाचा विस्तार करण्यासाठी राज्य शासनासोबत अधिक सघन सहकार्य करण्यात येणार आहे.

## सेवानिवृत्तांचा पुन्हा सत्तेवर कब्जा?

सरकारचा कंत्राटी निर्णय वादात : कर्मचारी संघटनांचा आक्षेप

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ११ :**

राज्य सरकारने सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना कंत्राटी पद्धतीने पुन्हा सेवेत घेण्याचा निर्णय घेतल्याने प्रशासनात वादाची नांदी झाली आहे.

६५ वर्षांपर्यंत सेवा देण्याचा मार्ग खुला करत, सरकारने मंत्रालयासह विविध विभागांतील निवृत्त अधिकारी पुन्हा कार्यरत करण्याचा मार्ग मोकळा केला आहे. मात्र, हा निर्णय कर्मचाऱ्यांच्या संघटनांना रुचलेला नाही. हा निर्णय नव्या पिढीवर अन्याय करणारा असून, मर्जीतल्या अधिकाऱ्यांची निवड करून पक्षपाती राजकारणाला खतपाणी घालणारा आहे, असा आक्रोश संघटनांनी व्यक्त केला आहे.

**तरुणांसाठी अडथळा?**

राज्यसेवेत नियमित भरती न करता कंत्राटी पद्धतीला प्राधान्य देणे ही सरकारची धोरणात्मक भूमिका असल्याचा आरोप कर्मचारी संघटनांनी यापूर्वीही केला होता. आता निवृत्त अधिकाऱ्यांनाच पुन्हा संधी देण्याच्या निर्णयामुळे, नव्या उमेदवारांच्या संधींवर गदा येत असल्याचं चित्र समोर येत आहे.

राज्य सरकार निवृत्तीचं वय ६० करण्यास तयार नाही, पण त्याच अधिकाऱ्यांना ६५ व्या वर्षापर्यंत पुन्हा सेवेत घेते, हे दुटप्पी धोरण नव्हे तर काय? असा सवाल संघटनांनी उपस्थित केला आहे.

या निर्णयाच्या अंमलबजावणीत निवडक अधिकाऱ्यांना संधी देण्याची शक्यता, तसेच सरकारच्या जवळच्या आणि मर्जीतल्या अधिकाऱ्यांनाच प्राधान्य मिळेल, अशी भीती संघटनांनी व्यक्त केली आहे. यामुळे कारभारात गटबाजी, भेदभाव आणि निष्पक्षतेचा अभाव दिसून येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## एसीचे तापमान २० अंशापेक्षा कमी नको

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ११ :**

येत्या काळात, जर तुम्ही नवीन एसी घेतला तर तुम्ही तो १६ किंवा १८ अंशांवर चालवू शकणार नाही, तुम्ही तो फक्त २० ते २८ अंशांदरम्यान सेट करू शकाल.

उन्हाळ्याच्या हंगामात एसीमधून होणारा वीज वापर थांबवण्यासाठी केंद्र सरकार लवकरच एक नवीन नियम आणत आहे.

सरकारचा दावा आहे की यामुळे वीज बचत होईल, बिल कमी होईल आणि देशभरातील लाखो ग्राहक पुढील तीन वर्षांत १८,०००-२०,००० कोटी रुपयांची बचत करतील. ऊर्जा मंत्री मनोहर लाल म्हणाले- एसी उत्पादक कंपन्यांसाठी नवीन नियमामुळे कूलिंग आणखी चांगले होईल.

## काँग्रेसचा गुरुवारी राज्यभर मशाल मोर्चा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :**

राज्य विधानसभा निवडणुकीतील वाढीव मतदानाचा मुद्दा काँग्रेसने पुन्हा हातात घेतला असून या मुद्द्यावर जनजगृती करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी गुरुवारी राज्यभर मशाल मोर्चा काढण्यात येणार आहे.

या मोर्चाच्या माध्यमातून विधानसभा निवडणुकीतील घोटाळ्याची चौकशी करण्याची मागणी करण्यात येणार आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे स्वतः गडचिरोलीमधील आंदोलनात सहभागी होणार आहेत. विधानसभा निवडणुकीतील ' मॅच फिक्सिंग' ची चौकशी करण्याची मागणी काँग्रेसने केली आहे.






# कारवाया वाचवण्यासाठी अजितदादा सत्तेत...



**मुंबई :** अजित पवारांची आंदोलनवरची भूमिका ही लोकशाहीला छेद देणारी आहे. विरोधी पक्षाने आंदोलने केली नाहीत, तर सत्ताधारी माजतील, अशा शब्दांत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी अजित पवारांवर निशाणा साधला. स्वतःवरील कारवाया वाचवण्यासाठी दादा सत्तेत गेले, अशी टीकाही संजय राऊतांनी केली आहे. पालिका निवडणुकांसाठी सर्व तयारी केली असल्याची माहिती त्यांनी दिली. निवडणुका कशा लढवायच्या यासंदर्भात स्थानिक नेत्यांवर निर्णय सोपवण्यात आल्याचेही ते म्हणाले.

संजय राऊत म्हणाले की, अजित पवार यांनी आंदोलनावर जी भूमिका मांडली, ती लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाचे जे स्थान आहे, त्याला छेद देणारी आहे. विरोधी पक्षाने आंदोलने जर केली नाहीत, तर सत्ताधारी माजतील. राज्य-देश लुटतील. महानगरपालिका, जिल्हा परिषदा यांच्यावर डाके टाकतील. जनतेच्या प्रश्नांना कुणी वाचा फोडणार नाही. शरद पवारांनी त्यांचा जो पक्ष उभा केला, ते आंदोलनातून उभा केला. शिवसेनेसारखा पक्ष हे एक आंदोलन आहे. संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन झाले नसते किंवा अशी अनेक आंदोलने आम्ही केली नसती, तर आज अजित पवार उपमुख्यमंत्री किंवा पुढारी झाले नसते, असा टोलाही संजय राऊत यांनी लगावला.

सत्तेत राहुन लोकांची कामे एकेकाळी करत येत होती. पण आजकाल सत्ता तिजोरी लुटायलाच वापरली जाते. यावर अजित पवारांइतके दुसरे कोणीही भाष्य करू शकणार नाही. गेल्या दहा वर्षांत भाजप आणि त्यांच्यासोबतच्या लोकांनी सत्तेत राहून सर्व क्षेत्रांत असा एकही विभाग नाही की, जिथे लुटमार केली नाही. जनतेचे कोणते प्रश्न मार्गी लावले, हे नरेंद्र मोदींना विचारा, सत्तेत राहून ज्यांनी मागील काही काळामध्ये प्रचंड लुटमार केली, त्यांच्या चौकशा सुरू झाल्यानंतर ते पुन्हा सत्तेत गेले. जनतेची सेवा करायला गेले, असे कुणी म्हणत असेल, तर ते ढोंग आहे. सत्तेत ते यासाठी गेले की, त्यांना स्वतःची कातडी, स्वतः वरील कारवाया वाचवायच्या होत्या, अशा शब्दात संजय राऊत यांनी टोला लगावला.

## बाबा सिद्दीकी हत्या प्रकरण
# झीशानला भारतात आणणार



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणातील मुख्य सुत्रधार झीशान अख्तर उर्फ जस्सी पुरेवाल याला कॅनडा पोलिसांनी अटक केली आहे. याबाबत पोलिस दलातील सूत्रांनी याची पुष्टी केली आहे. झीशान सध्या कॅनडा पोलिसांच्या ताब्यात असल्याची आपल्याकडे ठोस माहिती असल्याचे मुंबई पोलिसांचे म्हणणे आहे. मुंबई पोलिस आता झीशान अख्तरचे प्रत्यार्पण करुन त्याला भारतात आणण्याची प्रक्रिया सुरु करु शकतात. झिशान अख्तरने देश सोडून गेल्याचा दावा केला होता. त्यानंतर आता त्याला कॅनडातील सरे पोलिसांनी अटक केली आहे. त्याला भारतात आणणार असल्याची चर्चा असली तरी पोलीस विभागाकडून अद्याप याची पुष्टी झाली नाही.

# बीएमसीसाठी ठाकरेंची रणनिती



**मुंबई :** राज्यात पुढील तीन-चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्था आणि महापालिकेच्या निवडणुका जाहीर होऊ शकतात. या पार्श्वभूमीवर प्रभाग रचनेचे आदेश नगरविकास विभागाने जारी केले. हे आदेश आल्यानंतर शिवसेना ठाकरे गटाने मुंबई महानगरपालिकेसाठी कंबर कसली आहे. उद्धव ठाकरे गटाने विशेष रणनिती आखली असून मुंबईतील उपनेत्यांवर विशेष जबाबदारी सोपवण्यात आली आहे. पक्षाने १२ उपनेत्यांवर विधानसभा निहाय जबाबदारी देण्यात आली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची घोषणा अद्याप झाली नसली, तरी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आतापासूनच मैदानात उतरण्याची तयारी सुरू केली आहे. मातोश्रीवर झालेल्या बैठकीत ठाकरे गटाकडून मुंबई महानगर पालिकेच्या पार्श्वभूमीवर उपनेत्यांवर विधानसभानिहाय जबाबदारीचे वाटप करण्यात आले आहे. मतदार संघात जाऊन आढावा बैठका, माजी नगरसेवक, शाखा प्रमुख इतर पदाधिकाऱ्यांशी चर्चा करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती आहे.

# मुंबईत प्रभाग रचना जैसे थे!

■ महासागर प्रतिनिधी
**मुंबई, दि. ११ :**
गेल्या तीन ते चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

या निवडणूकांसाठी तीन टप्प्यात प्रभाग रचना तयार करण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत. त्यामुळे आता ऑक्टोबर महिन्यात मुंबई महानगर पालिकेच्या निवडणूका लागल्याचा अंदाज आहे. तत्पूर्वी लोकसंख्येनुसार मुंबई महानगर पालिकेत प्रभाग रचना करण्यासंदर्भात राज्य सरकारने आदेश दिले आहेत. राज्यातील ९ महानगर पालिकांच्या निवडणूका घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

राज्यात ज्या ठिकाणी महापालिका निवडणुका घेण्यात येणार आहेत त्या ठिकाणी आता प्रभाग रचनेचे आदेश दिलेले आहेत. त्यामध्ये प्रभागांची रचना कशी करायची आणि लोकसंख्येचे काय निकष ठरवायचे याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. अ, ब आणि क वर्ग महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक चार सदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश दिले आहेत.

**जुन्याच प्रभागानुसार निवडणुका**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका तात्काळ घेण्याचे आदेश जारी झाले आहेत. राज्यातील ९ महानगर पालिकांच्या निवडणूका होत आहे. महापालिकांची प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश जारी करण्यात आल्यानंतर मुंबईमध्ये जुन्याच प्रभागानुसार निवडणुका होणार असल्याचे स्पष्ट झालं आहे.



त्यानुसार मुंबई महानगरपालिकेमध्ये २२७ एक सदस्यीय प्रभाग रचना करण्यात येणार आहे. तर पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, नवीमुंबई, पिंपरी चिंचवड, छत्रपती संभाजीनगर, यासह इतर सर्व महापालिकांमध्ये चार सदस्यांचे प्रभाग असणार आहेत.

मुंबईमध्ये आधीही २२७ प्रभाग होते. महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर त्यामध्ये वाढ होऊन २३६ प्रभाग करण्यात आले होते. पुन्हा महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर २२७ प्रभाग करण्यात आले. त्यास सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. परतू ती याचिका फेटाळण्यात आली. त्यामुळे मुंबईमध्ये आता २२७ प्रभाग असणार आहेत.

महानगर पालिकांच्या निवडणूक प्रक्रीयेमध्ये
१) प्रभाग रचना करणे आणि आरक्षण ठरविणे
२) विधानसभा मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करणे,
३) प्रत्यक्षनिवडणूक घेणे अशा तीन प्रमुख टप्प्यांचा समावेश होतो. या तिनही टप्प्यांच्या प्रक्रियेमध्ये उप-टप्पे देखील आहेत.

**या महानगरपालीकांसाठी चार सदस्यीय प्रभाग**

अ, ब आणि क वर्ग महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक चार सदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश जारी झाले आहेत.

महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, दिनांक ११.०३.२०२२, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ५ मधील तरतुदीनुसार निवडणुकीकरिता प्रभाग रचना शासनाने, राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने करावयाची आहे.

खालील अ, ब आणि क वर्ग महानगरपालिकांच्या बाबतीत प्रभाग रचनेचे प्रारुप तयार करण्याच्या अनुषंगाने सदस्य संख्या निश्चित करुन प्रभाग रचनेचे प्रारुप तयार करणे ही जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त यांची असणार आहे.

अ वर्ग महानगर पालिकेत मुंबईसह पुणे, नागपूर शहराचा तर ब वर्ग महानगर पालिकेत ठाणे, नाशिक, पिंपरी-चिंचवडचा आणि क वर्ग महानगर पालिकेत नवी मुंबई, वसई-विरार, छ. संभाजी नगर, कल्याण-डोंबिवली यांचा समावेश आहे.

## शरद पवारांकडून बच्चू कडूंशी
# फोन द्वारे विस्तृत चर्चा

■ महासागर प्रतिनिधी
**मुंबई, दि. ११ :**
माजी मंत्री तथा प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू हे अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज मोझरी येथे अन्नत्याग आंदोलन करत आहेत.



शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला यांच्या वेगवेगळ्या मागण्यांना घेऊन ते आंदोलनाला बसले आहेत. काहीही झालं तरी मी अन्नाचा एकही कण घेणार नाही, असं बच्चू कडू यांनी जाहीर केलं आहे.

अशातच आता राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी बच्चू कडू यांनी फोन केला असल्याची माहिती समोर आली आहे. शरद पवार यांनी आज आंदोलनाला बसलेल्या बच्चू कडू यांना फोन करत त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. तसेच आंदोलनाबाबत माहिती विचारली. यावेळी बच्चू कडू यांनी सांगितले की, कलेक्टर आणि एसपी भेटायला आले होते, तसेच पालकमंत्र्यांशी बोलणं झालं आहे. त्यांनी मुख्यमंत्र्यांसोबत मीटिंग आयोजित करुन देऊ अशी माहिती दिली आहे.

मात्र मी मीटिंगच्या बदल्यात उपोषण मागे घेणार नाही. आम्हाला भेट नको, निर्णय हवा आहे. यानंतर बच्चू कडू यांनी तुमच्याकडून उद्या आंदोलनाची माहिती घेण्यासाठी आलं तर बरं होईल असं म्हटलं.

बच्चू कडू यांनी पुकारलेल्या आंदोलनामुळे त्यांची प्रकृती खालावत आहे. या आंदोलनामुळे त्यांचे वजन दोन किलोंनी घटले आहे. तसेच बच्चू कडू यांचा बीपीही लो झाला आहे. त्यांनी तत्काळ औषधं घ्यावीत, असा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. मात्र कडू यांनी उपचार घेण्यास नकार दिला आहे. त्यामुळे त्यांना अशक्तपणा जाणवत आहे.

# राज्यात पुन्हा आठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

■ महासागर प्रतिनिधी
**मुंबई, दि. ११ :**
राज्यातील प्रशासकीय विभागातील खांदेपालट सुरूच असून आज आणखी आठ आएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

कौशल्य विकास, पणन मंडळ आणि इतर विभागांना नवे प्रमुख मिळाले आहेत. यामध्ये वरिष्ठ आयएएस अधिकारी नितीन पाटील यांची राज्याच्या कापूस उत्पादक विपणन महासंघाच्या व्यवस्थापक पदी बदली करण्यात आली आहे.

आप्पासाहेब धुळाज यांच्याकडे राज्याच्या ओबीसी बहुजन कल्याण विभागाच्या सचिवपदाचा कार्यभार सोपवण्यात आला आहे. तर मिन्नू पी एम आणि मानसी यांच्याकडे नवीन जबाबदारी देण्यात आली आहे.

नितीन पाटील आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता, नवी मुंबई यांना महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक विपणन महासंघ, मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

ए.बी. धुळाज व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक विपणन महासंघ, मुंबई यांना सचिव, ओबीसी बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

लहू माळी व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, मुंबई यांना आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता, नवी मुंबई म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. बाबासाहेब बेलदार अतिरिक्त विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी नगर विभाग यांना महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

मुरुगनंथम एम. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

आदित्य जीवने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांची सहव्यवस्थापकीय संचालक, महाडिसकॉम, छत्रपती संभाजी नगर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

मिन्नू पी.एम. सहायक जिल्हाधिकारी, भातकुली-तिवसा उपविभाग, अमरावती यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

मानसी सहाय्यक जिल्हाधिकारी, देसाईगंज उपविभाग, गडचिरोली यांना महापालिकेच्या आयुक्त म्हणून नियुक्त करण्यात आल्याचे आदेशात दिसून येते.

# शिरसाटांची नाराजी अन् बावनकुळेंची भेट

■ महासागर प्रतिनिधी
**मुंबई, दि. ११ :**
मुख्यमंत्री माझी लाकडी बहिण योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवण्याच्या कारणावरून मंत्री संजय शिरसाट नाराज असल्याची चर्चा सुरू होती.

या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शिरसाट यांच्या मुंबईतील घरी जाऊन त्यांची भेट घेतली. माझ्या मतदारसंघातील ड्रॅगन टेम्पलच्या विकास कामासंदर्भात ही भेट असल्याचे बावनकुळे यांनी नंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.



विश्वविख्यात कामठी येथील ड्रॅगन पॅलेस टेम्पल या बुद्धिस्ट स्थळाच्या विकास कामाच्या भूमिपूजन संदर्भात आपण चर्चा करण्यासाठी मंत्री संजय शिरसाट यांची भेट घेतली असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले. हे काम तातडीने चालू करण्यासाठी माजी मंत्री सुलेखा कुंभारे आणि आम्ही शिरसाट यांची भेट घेतली असल्याचे त्यांनी सांगितले. या मंदिराची जागा आणि विकासाच्या संदर्भात काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करायची होती. त्यामुळे आम्ही शिरसाट यांच्या घरी आलो असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

मंत्री संजय शिरसाट हे देखील या ठिकाणी भेट देण्यासाठी येणार असून लवकरच ते काम सुरू होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. लवकरच मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्यासह संजय शिरसाट आणि इतर मंत्री मिळून या विकास कामाचे भूमिपूजन करणार असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

अजित पवार आणि आम्ही सर्व मंत्री बसून ज्या - ज्या विभागाचा जो निधी बाकी आहे, त्यावर चर्चा करणार असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले. वास्तविक त्या- त्या मंत्र्यांना बोलवून अजित पवार नेहमीच चर्चा करत असतात. मागील वेळी देखील प्रत्येक मंत्र्यांशी चर्चा करून निधीचे वाटप केले होते. ही प्रक्रिया पारंपारिक चालू असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## पत्नीची हत्या करून पाकी नागरिकाची आत्महत्या

**नवी मुंबईत घडला थरार**

■ महासागर प्रतिनिधी
**मुंबई, दि. ११ :**
नवी मुंबईतील एका पाकिस्तानी नागरिकाने घरगुती वादातून आपल्या पत्नीची चाकूने वार करून हत्या केली आणि नंतर स्वतःलाही संपवले. मृतांची ओळख पटली आहे. नोतनदास उर्फ संजय सचदेव (४५) आणि त्याची पत्नी सपना नोतनदास (३५) अशी त्यांची नावे असल्याचे पुढे आले आहे. दोघेही नोव्हेंबर २०२४ मध्ये भारतात आले होते आणि दीर्घकालीन व्हिसावर राहत होते.

पोलिस उपायुक्त (डीसीपी) प्रशांत मोहिते यांनी सांगितले की, 'सोमवारी जेव्हा सपनाची बहीण तिच्या फ्लॅटवर पोहोचली तेव्हा दोघेही रक्ताच्या थारोळ्यात पडलेले आढळले. डॉक्टरांनी सपनाला जागीच मृत घोषित केले, तर नोतनदासचा रूग्णालयात मृत्यू झाला. चौकशीत असे दिसून आले की भांडणानंतर, नोतनदासने सपनावर स्वयंपाकघरातील चाकूने अनेक वार केले आणि नंतर स्वतःला जखमी केले. दोघेही गेल्या ६महिन्यांपासून त्यांच्या दोन मुलांसह या फ्लॅटमध्ये राहत होते.

पाकिस्तानी जोडप्याला दोन मुले आहेत. पती-पत्नीच्या मृत्यूनंतर मुलांना ताब्यात घेण्याबाबत मुंबई पोलिस गोंधळलेले आहेत. पोलिसांनी मुलांच्या भविष्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. त्यांच्या देखभालीची व्यवस्था केली जात असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. त्यांच्या ताब्यात घेण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांशीही चर्चा सुरू आहे. त्याचबरोबर जोडप्याच्या व्हिसा आणि ओळखीबाबतही चौकशी सुरू आहे.

# माजी आमदार जयवंतराव जगताप यांचा शिंदेसेनेत प्रवेश

■ **वृत्तसंस्था, सोलापूर, दि. ११ :**
करमाळा तालुक्याचे माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी राजकीय धक्कातंत्र वापरत मुंबई इथल्या मुक्तागिरी निवासस्थानी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश केला.

यावेळी सांगोल्याचे माजी आमदार शहाजी (बापू) पाटील, शिवसेना वैद्यकीय कक्षाचे कक्ष प्रमुख आणि शिंदे यांचे विश्वासू सहकारी मंगेश चिवटे, शिवसेनेचे करमाळा माढा विभागाचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे, सांगलीचे विठ्ठल पाटील, सिंदखेडराजा जि. बुलढाण्याचे माजी आमदार डॉ. शशिकांत खेडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. माजी आमदार जगताप यांच्या शिवसेना प्रवेशामुळे सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे.




# पत्नीपीडित पुरुषांनाही संरक्षण मिळावे!

औरंगाबादेतील वाळूंज भागातील पत्नीपीडित पुरुषांच्या आश्रमात काही पत्नीपीडित पुरुषांनी वटपौर्णिमेच्या आदल्या दिवशी पिंपळपूजन करून पिंपळपौर्णिमा साजरी केली.

हे पुरुष दरवर्षी पिंपळपौर्णिमा साजरी करतात. आमच्या बायकांनी आम्हाला इतका त्रास दिला आहे की आम्ही त्यांच्यासोबत सात जन्मच काय सात सेकंदही संसार करू शकत नाही म्हणूनच आम्हाला अशा प्रकारच्या बायका देण्यापेक्षा कायमस्वरूपी मुंजा ठेव अशी प्रार्थना ते यम आणि मुंजाला करतात.

हा प्रकार काहीसा विचित्र वाटत असला तरी खरा आहे. पुरुषही कौटुंबिक हिंसाचाराचे बळी ठरतात यावर अजूनही अनेकांचा विश्वास बसत नाही याला कारण आहे आपली पुरुष प्रधान संस्कृती. पुरुषच महिलांवर अत्याचार करतो, त्यांचा मानसिक छळ करतो हेच आजवर आपण पाहत आलो आहोत.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

पण आता काळ बदलला आहे. पुरुषही महिलांच्या अत्याचाराला बळी पडत आहे. आज कितीतरी पुरुष महिलांचा मानसिक अत्याचार सहन करत आहेत. पत्नी आपल्यावर अत्याचार करते आपला मानसिक छळ करते हे जर समाजात माहीत झाले तर आपलीच नाचक्की होईल या भीतीने अनेक पुरुष तो अत्याचार मुकाट्याने सहन करतात. ज्यांना हा अत्याचार सहन होत नाही ते आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात.

काही महिन्यांपूर्वी बंगळुरू मध्ये एका कंपनीत अभियंता असलेल्या ३४ वर्षीय अतुल सुभाष या तरुणाने पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी या तरुणाने आपल्यावरील आपबिती ९० मिनिटांचा व्हिडिओ काढून तसेच ४० पाणी सुसाईड नोट लिहून सांगितली. या तरुणाला त्याच्या पत्नी आणि सासरच्यांनी हुंडाबळीच्या चुकीच्या आरोपाखाली तरुंगामध्ये पाठवले होते.

काहीही चूक नसताना या तरुणाला तुरुंगात जावे लागले. न्यायालयात तो स्वतःचं निर्दोषत्व सिद्ध करू शकला नाही. समाजात त्याची बदनामी झाली त्यामुळे आलेल्या नैराश्यातून त्याने आत्महत्या केली.

अर्थात अशी आत्महत्या करणारा अतुल सुभाष हा पहिला तरुण नाही याआधीही अनेक तरुणांनी पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्या आहेत. आताही काही दिवसांपूर्वी पुणे जिल्ह्यातील उरुळी येथे एका तरुणाने याच कारणाने आत्महत्या केल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचनात आली.

महिलेचा पती व त्याच्या कुटुंबियांकडून होणारा छळ रोखण्यासाठी ४९८ ( अ ) हा कायदा करण्यात आला. महिलांना संरक्षण देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या या कायद्याचा अलीकडे मोठ्या प्रमाणात दुरुपयोग होऊ लागला आहे. या माध्यमातून पती आणि सासरच्या लोकांविरुद्ध वैयक्तिक सुड उगवला जात आहे.

महिलांनी त्यांच्या संरक्षणासाठी केलेल्या कायद्याचा अशाप्रकारे दुरुपयोग करू नये अशी टिप्पणी माननीय सर्वोच्च न्यायालयाने देखील केली आहे. तरीही या कायद्याचा दुरुपयोग कमी होत नाही. पत्नीने पती विरुद्ध तक्रार दिली तर त्याची तातडीने दखल घेतली जाते.

पत्नीवर अन्याय करणा?या पतीला तात्काळ अटक केली जाते पण पतीला पत्नी विरुद्ध कारवाई करायची असेल, तर आपल्या देशात कौटुंबिक हिंसाचार अधिनियमना सारखा कायदा उपलब्ध नाही. सध्या असलेला कौटुंबिक अधिनियम संरक्षण कायदा पुरुषांना संरक्षण देत नाही. महिलांप्रमाणेच पत्नी पीडित पुरुषांनाही संरक्षणाचा अधिकार मिळावा यासाठी सरकारने कौटुंबिक हिंसाचार अधिनियम कायद्यात दुरुस्ती करून पत्नी पीडित पुरुषांना संरक्षण द्यावे.

■ ■ ■

# पालखी मार्गावर परिवहन विभागाचा चित्ररथ

## रस्ते आणि वाहन सुरक्षेचे धडे देणार

■ महासागर प्रतिनिधी
**मुंबई, दि. ११ :**
सर्वांना आषाढी एकादशी निमित्ताने पंढरीच्या विठूरायाच्या दर्शनाचे वेध लागले आहेत. यात आता संत तुकारामाची पालखी येत्या १८ जूनपासून देहू येथून प्रस्थान करणार आहे.

या पालखीच्या मार्गावर आता राज्याच्या परिवहन विभागाच्या विविध योजनांची माहिती देणारा चित्ररथ फिरणार आहे. यामुळे राज्याच्या परिवहन विभागाच्या तसेच रस्ते सुरक्षा संदर्भात विविध माहितीद्वारे जनप्रबोधन करण्यात येणार आहे.

राज्याच्या परिवहन विभागाचा जनमानसात प्रचार आणि प्रसार करण्यासाठी परिवहन विभागाचा चित्ररथ यंदा तुकाराम महाराजांच्या पालखी मार्गावर दिंडी सोबत मार्गक्रमण करणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. या संदर्भात नियोजन आणि मार्गदर्शन करण्यासाठी मंत्री सरनाईक यांनी आज ११ जुन रोजी) पंढरपूरपर्यंत या पालखी मार्गाचा दौरा केला.



परिवहन मंत्री प्रताप सरनाईक पुढे म्हणाले, संत तुकाराम महाराजांची पालखी १८ जून रोजी देहू येथून प्रस्थान करणार आहे. १८ जून ते ५ जुलै दरम्यान संपूर्ण पालखी मार्गावर दिंडीसोबत परिवहन विभागाने तयार केलेल्या एलईडी स्क्रीन, पोस्टर , बॅनरच्या माध्यमातून विविध योजनांची माहिती देणारा चित्ररथ सहभागी होणार आहे.

या पालखी मार्गावर विविध ठिकाणी सर्वसामान्य नागरिक आणि भक्तगण संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. त्यांना या चित्ररथाच्या माध्यमातून परिवहन योजनांची विशेषतः रस्ता सुरक्षा विषयक प्रशिक्षण आणि प्रबोधन, सुरक्षित वाहन चालवणे अशा विविध योजनांची माहिती देण्यासाठी, त्याचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी या अभिनव उपक्रमाची यंदापासून सुरुवात करण्यात येणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिली. यावेळी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.






# २ हजार ५८८ कोटी ५५ लाख रू.निधीतून विकास कामे

## ▪मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विविध २१ कामांचे भूमिपूजन व लोकार्पण






## अकोला जिल्ह्यातील विकासाचा प्रवाह गतिमान

▪**अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**

अकोला जिल्ह्यात सुमारे अडीच हजार कोटींहून अधिक म्हणजेच २ हजार ५८८ कोटी ५५ लाख रूपयांच्या निधीच्या विविध २१ विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज झाले. सिंचन, रस्ते, रूग्णालय सुधारणा, सांस्कृतिक भवन, तरण तलावासह विविध प्रशासकीय इमारती अशा विकास कामांमुळे जिल्ह्यातील विकासाचा प्रवाह गतिमान होणार आहे.

विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवनात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार रवींद्र चव्हाण, आमदार हरिष पिंपळे, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार किरण सरनाईक, आमदार श्याम खोडे, विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल, पोलीस महानिरीक्षक रामराव पोकळे, जिल्हाधिकारी अजित कुंभार, पोलिस अधिक्षक अर्जित चांडक आदि मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते सर्वप्रथम जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नवीन, अद्ययावत व सुसज्ज इमारतीचे लोकार्पण झाले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील स्वागत कक्ष, हिरकणी कक्ष, आनंदी कक्ष, आवश्यक दस्तऐवज मिळण्यासाठी किऑस्क सुविधा आदींचे निरीक्षण केले. त्यानंतर नियोजन भवनात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते





एकाचवेळी ऑनलाईन पध्दतीने विविध विकास कामांचा शुभारंभ झाला.अकोला येथील तहसील, तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या अद्ययावत इमारतीचे तसेच महिला व बालविकास भवनाचे लोकार्पण झाले. पूर्णा नदीवरील काटीपाटी बॅरेज प्रकल्पाचे भूमीपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले.

सुमारे ४५४.६२ कोटी रूपयांच्या निधीतून सिंचनाची व्यवस्था निर्माण होऊन शेतकरी बांधवांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून कृषी संशोधनाचा वारसा असलेल्या अकोला भूमीत २४९.४१ कोटी रूपये खर्चून बांधण्यात आलेल्या पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयाच्या इमारतीचा कोनशिला समारंभही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ऑनलाईन पध्दतीने झाला.अकोला शहरात अमृत २.० योजनेत ६२९.०६ कोटी रू. निधीतून मलनि:सारण (टप्पा-१) चे काम, तसेच शहरासाठी १८.९९ कोटी रू. निधीतून प्रधानमंत्री ई-बस सेवा योजनेत ई-बस डेपो व चार्जिंग स्टेशनचे भूमिपूजन झाले. त्याचप्रमाणे, १५ कोटी रू.निधीतून अद्ययावत सांस्कृतिक भवन, सुमारे ९.९६ कोटी रू. निधीतून ऑलिंपिक दर्जाचा तरणतलावाचा कोनशिला समारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला.

'हायब्रीड ॲन्युइटी' अंतर्गत मुर्तिजापूर-दहिगाव-गुडधी-उमरी- अकोला राज्य महामार्ग २८४, तसेच अकोला-मलकापूर-कानशिवणी-मोरगांव काकड- बोरगांव खुर्द जिल्हा प्रमुख मार्गाची सुधारणा ४१०.१० कोटी रू. निधीतून होणार आहे. त्याचे भूमिपूजन यावेळी झाले. त्याचप्रमाणे, उकळी बाजार-नेर- नांदखेड- किनखेड राज्य महामार्ग २७८, किनखेड ते दहिहंडा महामार्गाची सुधारणा, अकोट मतदारसंघातील राज्यमार्ग क्र.४७ रावेर, पातूर्डा, पिंपळगाव, खांडवी, जळगाव जामोद- हिवरखेड- अकोट या मार्गावरील (रंभापूर ते हिवरखेड ते वारखेड भाग) सुधारणा ३११.४४ कोटी निधीतून होत आहे. बार्शिटाकळी शहरात ९.९९ कोटी रू. निधीतून मुख्य रस्ता होत आहे. या कामांचे भूमिपूजन झाले.सर्वोपचार रुग्णालयात १५१.५६ कोटी रू. निधीतून नवीन वॉर्ड इमारतीचे बांधकाम करण्यात येणार आहे. यामुळे रुग्णांसाठी सुविधा निर्माण होणार असून त्याचे भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले.

अकोला येथे १२९.२३ कोटी निधीतून पोलीस अधिकारी व कर्मचा-यांसाठी दक्षतानगर येथे २४६ निवासस्थाने व परिसर विकासकामांमुळे कर्तव्याप्रती २४ तास बांधील असणा-या पोलीसांसाठी निवासाची सोय निर्माण होणार आहे.

## अजित दादांना भावनिक पत्र दादा साद देतील का

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार हे तब्बल १४ १५ वर्षानंतर कार्यक्रमासाठी अकोला दौऱ्यावर येत आहेत .या अगोदर दादा आले असता त्यांनी सहकार नेते यांच्या निवासस्थानी जेवण केले होते यावेळेस त्यांनी जेवणासाठी आमदार अमोल दादा मिटकरी यांचे निवासस्थान निवडले अमोल दादा मिटकरी हे गरिबीतून आलेले कार्यकर्ते आहेत त्यांच्या इथे जाण्याचा आम्हाला आक्षेप नाही. दादांनी यावेळेस माझ्यासारख्या निष्ठावान पक्षाची पंचवीस वर्ष निष्ठा बाळगून असलेल्या कार्यकर्त्याच्या घरी चहापाणी घ्यायसाठी योग्य पाच मिनिटे तरी वेळ द्यावा मला २५ वर्षात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांनी कुठल्याही मंडळावर ,जिल्ह्याच्या समितीवर, किंवा सर्वात खाली विशेष कार्य दंडाधिकारी या पदावर सुद्धा नेमणूक केली नाही. माझीच नाही तर माझ्या कार्यकर्त्यांची सुद्धा कुठेच नेमणूक झाली नाही, पक्षाने फक्त जबाबदाऱ्या दिल्या आणि त्या मी प्रमाणिकपणे पार पाडल्या सेवादल संघटक, सेवा दल महानगर अध्यक्ष, प्रदेश संघटन सचिव, अमरावती शहर निरीक्षक, ओबीसी महानगर अध्यक्ष, असे पदे पार प्रमाणिकपणे निभावले मी संघटन मध्येच काम करत आलो असून प्रत्येक वेळेस माझ्यावर महानगरपालिकेच्या निवडणुकीत अन्याय झालेला आहे पहिले काँग्रेस सोबत आघाडीमध्ये नंतर पक्षातीलच काही लोकांनी दुसऱ्यांना तिकीट देऊन माझ्यावर अन्याय केला परंतु मी कधीही आक्षेप घेतलेला नाही जाऊ द्या जे झालं ते झालं. मी दादांच्या मुंबई येथील मंत्रालय मधील सहाव्या माळ्यावर स्वर्गीय शिवाजीराव कोरडे यांच्या सोबत होतो त्यावेळेस आमचा जीव कसा वाचला आहे आम्हालाच माहीत आहे.

त्यावेळेस सुद्धा पक्षाच्या कामासाठीच आम्ही तिथे होतो परंतु दादा आता अकोला जिल्ह्याच्या दोन दिवस दौऱ्यावर आहेत तरी माझ्या घरी दादांनी चहासाठी तरी यावं अशी माझी प्रामाणिक इच्छा आहे मी तसे निवेदन त्यांचे पीए अनिल ढिकले, सुनील मुसळे, संदीप वराडे साहेब आदींना पाठवलेले आहे परंतु त्यांचा अद्याप पर्यंत मला उत्तर आलेलं नाही तरी हे खुले पत्र मी दादांना पाठवीत आहे

**आपला स्नेहांकित**
**अनिल मालगे**
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हा परिषदे प्रमुख
तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी
प्रामाणिक कार्यकर्ता

## राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आज अकोल्यात

### जिल्ह्यातील विकासकामांबाबत आढावा बैठक

▪**अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत उद्या (१२ जून) जिल्ह्यातील विकासकामांची आढावा बैठक नियोजनभवनात होणार आहे.

त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे : स. ९.३५ वा. शिवणी विमानतळ, अकोला येथे आगमन व जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रयाण, जिल्हाधिकारी कार्यालय येथे ९.४५ वा. आगमन, स. १० वा. अकोला व वाशिम जिल्ह्यातील



विविध विकासकामे तथा योजनांच्या अंमलबजावणीबाबत जिल्हास्तरीय आढावा बैठक, दु. १२ वा. पत्रकार परिषद, नंतर मोटारीने पक्ष कार्यालयाकडे प्रयाण, दु. १२.३० वा. महानगर कार्यालय, न्यू क्लॉथ मार्केटसमोर, अकोला येथे राखीव, दु. १२.५५ वा. शिवसंभव, कौलखेड रस्ता, नवे आरोग्यनगर, हिंगणा फाटा, अकोला येथे आगमन, दु. १२.५५ ते १.४५ राखीव, दु. १.४५ ते नागरिक व कार्यकर्त्यांच्या भेटी, नंतर पोलीस लॉन्सकडे रवाना, दु. २.३० वा. पोलीस लॉन्स येथे आगमन व कार्यकर्ता मेळावा, दु. ४ वा. खामगावकडे प्रयाण.

## विवाहितेला फुस लावून पळवून नेल्याप्रकरणी अकोट ग्रामीण पोलिसात तक्रार दाखल

**अकोट:** तालुक्यातील आडगाव खुर्द येथील विवाहितेला अपहरण करून घरा शेजारी राहणाऱ्या अविनाशदामोदर या युवकाने पळवून नेल्याची तक्रार गणेश रामकृष्ण ठाकरे यांनी अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये दाखल केली आहे. गणेश ठाकरे यांची पत्नी नऊ मे रोजी तालुक्यातीलचंडिकापूर येथे काही कामानिमित्त गेली होती.

शासनाचे आदेशही त्यांचेच, आश्वासनेही त्यांचीच

## पण आवाज उठवला की बळीराजाला नजरकैद!

▪**अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अकोला दौऱ्यावर असताना, त्यांच्या स्वागताच्या झगमगाटाआड शेतकऱ्यांचा आक्रोश पुन्हा एकदा दडपण्यात आला. मुर्तीजापूर शहर पोलिसांनी राहुल भाऊ वानखडे, अरविंद तायडे, सय्यद रियाज, शुभम जवंजाळ, प्रवीण खोत, संतोष रुद्रकार यांच्यासह १२ शेतकरी नेत्यांना सकाळपासूनच पोलीस ठाण्यात नजरकैदेत ठेवले.

या नेत्यांनी शासनाच्या खोट्या आश्वासनांचा पर्दाफाश करण्यासाठी बैलगाडी, ट्रॅक्टर मोर्चा व तहसीलवर आंदोलन करण्याचा निर्धार केला होता. मात्र, शासनाने पोलिसांच्या माध्यमातून लोकशाही दबावात ठेवण्याचा प्रयत्न केला.

मुख्यमंत्र्यांनी निवडणुकीदरम्यान शेतकऱ्यांना पिकविमा, कर्जमाफी आणि वसुली थांबवण्याची ग्वाही दिली होती. मात्र मुर्तीजापूर तालुक्यातील चार महत्त्वाच्या मंडळांना पिकविमा व अतिवृष्टीच्या मदतीपासून वगळण्यात आले. परिणामतः हजारो शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून, कर्जाच्या ओझ्याने आत्महत्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

शासनाच्या या दुटप्पी धोरणावर आज शेतकरी संघटना आक्रमक झाल्या असून, 'शासन गोष्टी करताना गप्प, पण विरोध करताच पोलिसी कारवाईत अडकवते', अशी संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे.

मुख्यमंत्र्यांचा 'संवाद दौरा' हा फक्त साजशृंगारासाठी आहे, प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या वेदना, आत्महत्या, अन्याय आणि हालअपेष्टा झाकण्याचा प्रयत्नच सुरू आहे, असा घणाघात आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

'गोष्टी करायच्या वेळेस सरकार नाही, पण विरोध केलात तर डोळ्यात अंगार!' - हेच आजच्या अकोल्यात दिसून आले.

## मजुरावर लाकडी हल्ला! मोबाईल फोडून बेदम मारहाण

### उसन्याच्या पैशावरून थेट दहशत

▪**मुर्तिजापुर,दि ११ (प्रतिनिधी) :**

उसन्या पैशाच्या वादातून थेट रस्त्यावर न्याय घेण्याचा प्रकार भिमनगर जुनिवस्ती येथे उघडकीस आला आहे. दुपारच्या रणरणत्या उन्हात दोन तरुणांनी मजूर व्यक्तीवर लाकडी काठ्यांनी हल्ला करत मोबाईल फोडल्याची गंभीर घटना घडली.

घटनेनंतर परिसरात तणाव निर्माण झाला असून आरोपींच्या विरोधात भादंवि ऐवजी नव्या इछड कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादी सतिष भाऊराव ढोके (वय ४४,




व्यवसाय मजुरी) हे आपल्या घरासमोर असताना अनिकेत शंकर मानवटकर (वय २५) याने 'उसने दिलेले पैसे परत कर' असा जाब विचारला. फिर्यादीने पैसे नाकारले असता आरोपी अनिकेत व त्याचा साथीदार धम्मा दीपक बागडे (वय ३०) यांनी संगनमत करून लाकडी काठ्यांनी डावा खांदा, दोन्ही हात व मांडीवर बेदम मारहाण केली. यावेळी त्यांच्या अँड्रॉइड मोबाईलचा स्क्रीनही फोडण्यात आला.

गुन्हा क्र. २९४/२०२५ प्रमाणे इछड कलम ११८(१), ३२४(४), ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास ठाणेदार अजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.तपास अधिकारी - अडख गजानन थाटे (ब.नं. १४६६) गुन्हा दाखल अधिकारी - अडख नंदकिशोर टिकार (ब.नं. ११२२) हे तपास करीत आहे.

## बच्चुभाऊच्या आंदोलनात सर्व नागरीकांनी सहभागी व्हावे : राजेश खारोडे

▪**तेल्हारा,दि ११ (प्रतिनिधी) :**

दिनांक ८ जून २०२५ पासून बच्चू कडू बेमुदत अन्नत्याग आंदोलन करत आहेत. आजचा चौथा दिवस आहे त्याची प्रकृती बिघडत आहे सत्ताधारी सरकारला शेतकरी शेतमजुराचा सामान्य माणसाचा काही घेणं देणं नाहीये एकीकडे करोड रुपये उद्योजकांचे माफ होत आहेत परंतु महाराष्ट्र मध्ये शेतकरी रोज आत्महत्या करत आहे त्या शेतकऱ्याकडे पाहायला यांना वेळ नाही त्यांचं कर्ज माफ करायला यांना वेळ नाही काय तर आपला देश शेतकरी प्रधान आहे शेतकऱ्याचा इतिहास आहे असे भाषण देत आहेत माजी आमदार बच्चू कडू सत्तेत नसताना सुद्धा शेतकऱ्याची बाजू घेऊन शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी जीवाचे बलिदान देत आहेत आणि दुसरीकडे सत्तेत बसलेले सरकार खोटे आश्वासन देऊन स्वतःची तिजोरी भरत आहेत या सरकारने आता शेतकऱ्यांचा अंत पाहू नये अन्यथा महाराष्ट्रभर शेतकऱ्यांचा संतापाला



समोर जावं लागेल याला सर्व जबाबदार शासन राहील असे आव्हान राजेश पाटील खारोडे अकोला जिल्हा महासचिव यांनी केले आहे आंदोलनाचा चौथा दिवस असूनही शासन करते कलेक्टर पालकमंत्री आंदोलनाच्या स्थळी येऊन भेट देत नाहीत ही फार मोठी शोकांतिका आहे परंतु महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील शेतकऱ्यांच्या विचारधाराला महत्व देणाऱ्या अनेक शेतकरी नेते पत्रकार सामाजिक कार्यकर्ते भाऊला भेट देऊन विचारपूस करत आहेत शेतकरी कर्जमाफी व अन्य रास्त मागण्यांसाठी मा. बच्चूभाऊ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज महासमाधी जवळ, गुरुकुंज मोझरी, ता. तिवसा, जि. अमरावती येथे बेमुदत अन्नत्याग आंदोलन करणार आहेत. या आंदोलनात जिल्हाभरातून हजारो शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर, दिव्यांग, कामगार, मेंढपाळ, मच्छीमार, ग्रामपंचायत कर्मचारी व वाडी-वस्तीतील जनतेचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर, आपल्या भागातील सर्व नागरिकांनी सुद्धा बच्चू भाऊंच्या उपोषणाला पाठिंबा देत आंदोलनाची धार वाढवावी.

तसेच आपण आंदोलनाबाबत जागृती करावी आणि बच्चूभाऊंच्या लढ्याला पाठिंबा द्यावा. असे आव्हान अकोला जिल्हा महासचिव राजेश पाटील खारोडे यांनी केले यावेळी तेल्हारा तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर आखरे शेतकरी आघाडीचे नेते बाळासाहेब नेमाडे संतोष गिर्हे रणवीर काकडे दिलीप खंडाळकर श्रीराम खारोडे अपंग क्रांतीचे तालुका अध्यक्ष संदीप ताथोड श्याम साबळे ऋषिकेश खारोडे प्रहार व शेतकरी असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते

## तानखेड गावातील विद्युत पुरवठा करणारे पोलच पडल्याने गावकरी अंधारात

### तर अनेकांच्या घराचे छप्पर उडाले

**वणी रंभापूर :** अकोला पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या ग्राम तानखडे परिसरात बुधवार च्या दुपारी अचानक आलेल्या वादळ वाऱ्या ने गावातील नागरिकांचे नुकसान झाले असून विद्युत पुरवठा करणारी वहिनी खंडित झाली.अचानक जोरदार वादळ वाऱ्या आल्याने गावातील शेकडो वर्ष जुने चींचे झाड पडल्याने खुशाल गावंडे, विनायक गावंडे यांचे बैल गंभीर जखमी



झाले असून विनायक गावंडे यांच्या घराचे छप्पर उडाले यामुळे गावातील विद्युत पुरवठा करणारी वहिनी चे जवळपास पंचवीस पोल तार सह खाली पडले दरम्यान वितरण विभाग चे मोठे नुकसान झाल्याचे चित्र निर्माण झाले गावात विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी व ज्या नागरिकांचे नुकसान झाले त्यांचे माहिती घेण्यासाठी सरपंच महेंद्रकुमार अरुण घरडे यांनी तत्काळ सचिव सह वितरण विभाग चे अभियंता यांना संपर्क साधला आहे.

# मेक इन इंडियाचा डिफेन्समध्ये धमाका

गेल्या ११ वर्षांत देशाच्या संरक्षण क्षेत्रात मोठा बदल दिसून आला. भारताची संरक्षण नीती केवळ सुरक्षे इतपत मयार्दीत नाहीत. संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरता, नवकल्पना, जागतिक स्पर्धेत भारताने सशक्त पाऊल टाकले आहे. भारतीय संरक्षण क्षेत्राकडे जग नव्या दृष्टिकोनातून पाहात आहे. केंद्र सरकारची रणनीती, मजबूत इच्छाशक्ती आणि भविष्यासाठीची धोरण यासाठी कारणीभूत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संरक्षण क्षेत्रातील उत्पादनात आधुनिकीकरण आणि आत्मनिर्भरतेला अधिक महत्त्व दिले आहे.

---






भारताच्या संरक्षण अर्थसंकल्पात मोठी वाढ झाली आहे. २०१३-१४ मध्ये हे बजेट २.५३ लाख कोटी होते. ते २०२५-२६ या वर्षात वाढून ६.८१ लाख कोटी रुपये इतके झाले. हा केवळ एक आकडा नाही. तर भारताची सुरक्षा, तांत्रिक प्रगती आणि आत्मनिर्भरतेच्या दृष्टीने मोठे पाऊल आहे.

भारताने संरक्षण उत्पादनात मोठी झेप घेतली आहे. २०२३-२४ मध्ये देशाने १.२७ लाख कोटी रुपयांचे संरक्षण उत्पादन केले होते. तर २०१४-१५ मध्ये ४६,४२९ कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. म्हणजे या काळात १७४% हून अधिकचा खर्च वाढला आहे.

**स्थानिक उद्योगांचा मोठा वाटा**

संरक्षण क्षेत्रात आता खासगी कंपन्या आणि स्टार्टअप्स पण मोठी भूमिका निभावत आहेत. संरक्षण उत्पादनात स्वदेशीचा नारा उपयोगी ठरला आहे. त्यामुळे विविध उपकरणांचे उत्पादन वाढणार आहे. संरक्षण मंत्रालयाने २०२४-२५ मध्ये २.०९ लाख कोटींचे १९४ संरक्षण करार केले होते. त्यातील १७७ करार हे स्थानिक उद्योग आणि स्टार्टअप्सला मिळाले आहेत. हा एक विक्रमच म्हणावा लागेल.

**औद्योगिक कॉरिडॉरमध्ये वाढली गुंतवणूक**

उत्तर प्रदेश आणि तामिळनाडूमध्ये संरक्षण औद्योगिक कॉरिडोरमध्ये बदल होत आहे. आतापर्यंत इंडस्ट्रीयल कॉरिडोरमध्ये ८,६५८ कोटींहून अधिकची गुंतवणूक झाली आहे. २५३ पेक्षा अधिक टङ्कव वर स्वाक्षरी झाली आहे. येत्या काळात ही गुंतवणूक ५३,४३९ कोटींपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

सरकारने आतापर्यंत ५ सकारात्मक स्वदेशी विषय सूची तयार केल्या आहेत. यामध्ये ५५०० अधिक वस्तूंचा समावेश आहे. यामध्ये ३००० हून अधिक संरक्षण उत्पादनं ही आता स्वदेशी आहेत. यामध्ये दारुगोळा, गन, असॉल्ट रायफल, हलके लढाऊ विमानं, रडार आणि चिलखती वाहनांसारख्या तांत्रिकदृष्या अत्याधुनिक प्रणालींचा समावेश आहे.

**संरक्षण निर्यातीत विक्रमी झेप**

देशातील संरक्षण क्षेत्र केवळ उत्पादनापुरतं मर्यादित राहिलेलं नाही, तर संशोधन, नवकल्पना आणि जागतिक निर्यातीच्या दिशेनं सुसंगत वाटचाल सुरू आहे. यामध्ये iDEX सारख्या नवाचारी उपक्रमांनी आणि सरकारच्या दृढ धोरणांनी क्रांती घडवली आहे.

त्यासाठी आतापर्यंत ४३० हून अधिक iDE करार करण्यात आले आहेत. भारताने संरक्षण क्षेत्रात नव प्रणाली, तंत्रज्ञानाच्या वापरासाठी २०१८ मध्ये iDE(इनोवेशन फॉर डिफेन्स एक्सिलेंस) ची सुरुवात केली होती. संरक्षण दलाने या प्रणालीशी संबंधित २,४०० कोटींहून अधिक खरेदी केली आहे. त्यासाठी २०२५-२६ या वर्षात ४४९.६२ कोटींचे बजेट निश्चित करण्यात आले आहेत.

**निर्यातीत नवीन विक्रम**

भारताच्या संरक्षण क्षेत्राने मोठी कात टाकली आहे. २०१३-१४ मध्ये ६८६ कोटींची निर्यात झाली होती. त्या तुलनेत २०२४-२५ मध्ये २३,६२२ कोटींची निर्यात वाढ दिसून आली. म्हणजे दहा वर्षांहून अधिकच्या काळात संरक्षण क्षेत्रातील निर्यात ३४ पट वाढली आहे. २०२९ वर्षापर्यंत ही निर्यात ५०,००० कोटींवर पोहचेल.

एकूणच काय तर संरक्षण क्षेत्रात गेल्या ११ वर्षात भारताने उत्तुंग भरारी घेतल्याचे दिसून येते.

■ ■ ■

# कामगार लढ्याचा इतिहास

नारायण मेघाजी लोखंडे यांनी आठवड्यातील सातही दिवस राबणाऱ्या कामगारांकरिता साप्ताहिक सुटीसाठी लढा दिला, मागणी रेटून धरली, दि.९ जून १८९० रोजी ती मंजूर करून घेतली आणि दि.१० जून १८९० पासून रविवार ही साप्ताहिक सुट्टी म्हणून जाहीर झाली. जी आजपर्यंत चालू आहे. गिरणी कामगारांना रविवारी साप्ताहिक सुट्टी मिळावी. दुपारी, कामगारांना अर्धा तास सुट्टी मिळावी. या मागण्या मान्य करून घेतल्या.

---

रविवार हा आठवड्यातील एक वार आहे. सोमवारपासून मोजला तर हा आठवड्यातील शेवटचा, म्हणजे सातवा दिवस येतो. भारतात हा वार रवीचा म्हणजेच सूर्याचा दिवस समजला जातो. त्यामुळे याला आदित्यावार (आदित्य=सूर्य) किंवा बोली भाषेत आइतवार म्हंटले जाते आणि इंग्रजीत संडे. ज्या ज्या देशावर कधी काळी ब्रिटिश सत्ता होती, त्या त्या देशात रविवार हा सुट्टीचा दिवस असतो. शिक्षणसंस्था, कार्यालये आणि बँका या दिवशी बंद असतात.



एके काळी भारतात कामगारांना रविवारची सुट्टी नसे. नारायण मेघाजी लोखंडे यांनी मुंबईत १८८४ मध्ये बॉम्बे मिल हॅंड्स ही भारतातली पहिली कामगार संघटना स्थापन केली. त्यांनी त्या काळच्या फॅक्टरी कमिशनकडे अनेक मागण्या केल्या. त्यातली रोजच्या कामातली अर्ध्या तासाची जेवणाची सुटी आणि रविवारची साप्ताहिक सुट्टी या दोन महत्त्वाच्या मागण्या होत्या. त्यासाठी २४ एप्रिल १८९० रोजी हजारो कामगारांचा मोर्चा निघाला होता.

अखेर ९ जून १८९० रोजी प्रस्तावाला मंजूरी देवून १० जून १८९० पासून दर रविवारची सुट्टी देण्याचे गिरणी मालकांनी सुरू केले. २०१५ साली १० जूनला या रविवारच्या सुट्टीचा १२५ वा वर्धापन दिन साजरा झाला. पुण्यात रविवार हा मिसळवार म्हणून ओळखला जातो.

पाश्चात्त्य कल्पनेप्रमाणे आठवड्याचा पहिला वार परंतु व्यावहारिकदृष्ट्या शेवटचा वार. या वाराचे नाव बहुतेक सर्व देशांत सूर्यवाचकच आहे. भारतीय ज्योतिषशास्त्रीय कल्पनेनुसार या दिवशीच्या सूर्योदयापासून पहिल्या होऱ्याचा अधिपती सूर्य असतो. जगात सर्व ठिकाणी सूर्याला देवताच मानतात.

जैन धर्मात नऊ वर्षे केले जाणारे एक व्रत आषाढमासाच्या शेवटच्या रविवारपासून पुढे ९ रविवार चालते. मुसलमान बांधव दर चांद्रमासातील पहिल्या रविवारी मंत्र-तंत्र करतात. काही खिस्ती पंथ रविवार हा प्रभूच्या प्रार्थनेचा व विश्रांतीचा दिवस म्हणून पाळतात. येशू खिस्ताच्या पुनरुत्थानाचा साप्ताहिक स्मृतिदिन म्हणून सर्वच खिस्ती लोक रविवार हा प्रार्थनेचा दिवस पाळतात.

कॉन्स्टंटाइन या सम्राटांनी आज्ञापत्र काढून रविवार हा सुटीचा दिवस ठरविला. ईस्टरच्या अलीकडचा रविवार पामसंडे म्हणून प्रसिद्ध आहे. खिस्तांचा जेरूसलेममध्ये विजयी प्रवेश झाला, तेव्हा त्यांच्या मार्गावर पामवृक्षाच्या फांद्या पसरल्या होत्या. म्हणून याला पामसंडे म्हणतात. रविवार विशेष शुभ मानला जात नसल्याने कोणताही उपक्रम या दिवशी सुरू करीत नाहीत. मात्र या दिवशी दृष्टिदोष दूर करणारी यंत्रे वापरून उपचार करण्यास हरकत नसते, असे मानतात.

रावबहाद्दुर नारायण मेघाजी लोखंडे (१८४८-१८९७) हे भारतातील कामगार संघटना चळवळीचे जनक होते. १९ व्या शतकात कापड गिरणीच्या कामगारांची परिस्थिती सुधारण्यासाठीच नव्हे तर जातीय आणि सांप्रदायिक मुद्द्यांवर त्यांनी केलेल्या धाडसी पुढाकारासाठीही त्यांची आठवण ठेवली जाते.

याशिवाय सन १८९५ मध्ये हिंदू-मुस्लिमांदरम्यान झालेल्या दंगलीत केलेल्या कामाबद्दल त्यांना रावबहादूर ही पदवीही देण्यात आली होती.

तत्कालीन ब्रिटिश भारत सरकारने त्यांना जस्टिस ऑफ पीस हा सन्मान देऊन सन्मानित केले होते. भारत सरकारने २००५ मध्ये त्यांच्या छायाचित्रासह एक टपाल तिकीट जारी केले.

नारायण मेघाजी लोखंडे हे महात्मा जोतिराव फुले यांचे प्रमुख सहकारी होते. त्यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील कण्हेरसर येथील माळी कुटुंबात झाला. त्यांचे शिक्षण हायस्कूलपर्यंत झाले होते. त्यांच्या पत्नीचे नाव गोपिकाबाई होते. गोपीनाथ नावाचा त्यांना एक मुलगा होता.

१८७४ मध्ये माहिती मिळाल्यानंतर ते सत्यशोधक चळवळीचे सदस्य झाले. सन १८८० पासून त्यांनी मुंबईहून प्रकाशित होणाऱ्या दीनबंधूचे व्यवस्थापन हाती घेतले. सुरुवातीस रेल्वे खात्यात कारकून म्हणून व पुढे पोस्ट खात्यात काही काळ नोकरी केल्यावर त्यांना मुंबईच्या मांडवी भागात एका कापड गिरणीत भांडारपालाची नोकरी मिळाली.

तेथे त्यांना दहशतीच्या वातावरणात दिवसातून १३-१४ तास काम करीत असलेले गिरणी कामगार आढळले; त्यांना आठवड्याची सुट्टीही मिळत नसे; परिणामी लोखंडे यांनी नोकरी सोडून स्वतःस कामगार चळवळीस वाहून घेण्याचे ठरविले.

त्याकरिता ते कामगार वस्तीतच राहू लागले. त्यांनी भारतातील पहिली कामगार संघटना बॉम्बे मिलहॅंड्स असोसिएशन २३ सप्टेंबर १८८४ रोजी स्थापन केली आणि समाजसेवेत स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले.

नारायण मेघाजी लोखंडे यांना भारतातील ट्रेड युनियन चळवळीचे जनक म्हणून ओळखले जाते. त्यांच्यासह महात्मा फुले यांनी मुंबईतील कापड कामगारांच्या सभांनाही संबोधित केले.

त्यांनी आठवड्यातील सातही दिवस राबणाऱ्या कामगारांकरिता साप्ताहिक सुटीसाठी लढा दिला आणि ९ व १० जून १८९० पासून रविवार ही साप्ताहिक सुट्टी म्हणून जाहीर झाली जी आजपर्यंत चालू आहे. एन.एम.लोखंडे यांच्यामुळे गिरणी कामगारांना मिळालेले काही हक्क हे होते.

गिरणी कामगारांना रविवारी साप्ताहिक सुट्टी मिळावी.

दुपारी, कामगारांना अर्धा तास सुट्टी मिळावी.

मिलच्या कामाला सकाळी साडेसहा वाजल्यापासून सुरुवात करावी आणि सूर्यास्तानंतर बंद करावी.

कामगारांचे पगार दर महिन्याच्या १५ तारखेपर्यंत करावेत.

ब्रिटिश राजवटीने त्यांना रावबहादूर ही पदवी बहाल केली होती. त्यांनी मुंबई कामगार संघ स्थापन केला. कष्टकरी वर्गाने एकजुटीने अन्यायाचा कडाडून प्रतिकार केला पाहिजे, अशी सशक्त प्रेरणाच ते आज ठरले आहेत.

फुले व त्यांचे सहकारी कृष्णराव भालेकर आणि लोखंडे यांनी शेतकरी आणि कामगारांना संघटित करण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्याचा प्रयत्न कोणत्याही संघटनेने केला नाही, हे विशेष!



कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे
गडचिरोली.
९४२३७१४८८३

■ ■ ■

# मुलगी श्रीमंत घरी खरंच सुखी राहील का?

आजकाल प्रत्येक आई वडिलांना वाटते की, आपली मुलगी श्रीमंत घरातील श्रीमंत मुलाला द्यावी. म्हणजे श्रीमंत घरी आपली मुलगी चैन विलासात राहील. तिला कोणत्याच गोष्टीची कमतरता भासणार नाही. तिला सर्व भौतिक सुख-सुविधा जाग्यावर उपलब्ध होतील.

ती ऐश्वर्यसंपन्न व राणीसारखे जीवन जगेल. सर्व भौतिक सुख-सुविधा तिच्या पायावर लोळण घेतील. समाजात व गावात आपली प्रतिष्ठा वाढेल. भावकीत व गावकीत मोठ्या अभिमानाने सांगता येईल की, माझी मुलगी खूप मोठ्या घरी दिली आहे. तिच्या घरी अमाप पैसा व संपत्ती आहे. अलिशान गाडी व अलिशान बंगला आहे.तिच्या घरात नोकर चाकर आहेत. तिच्या घरी कोणतीच व कशाचीच कमी नाही. असे नातेवाईकांना व भावकीला ठणकावून सांगण्यासाठी आणि आपली सामाजिक प्रतिष्ठा वाढावी म्हणून प्रत्येक आई वडील आपल्या मुलींना श्रीमंत घरी देण्याचे स्वप्न पाहत आहेत.

पण त्यासाठी तो मुलगा दारुडा व व्यसनी आहे का? आपल्या मुलीला खरंच सुखी ठेवेल का? का दारू पिऊन आपल्या मुलीला रोजच त्रास देईल? या गोष्टीचा विचार करणे हे प्रत्येक आई-वडिलांचे परम कर्तव्य आहे. केवळ मुलगा श्रीमंत आहे म्हणून कोणताही मागचा पुढचा विचार न करता मुलीला त्या घरी देणे म्हणजे स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेण्यासारखे आहे.

पण आजकाल तेवढा विचार कोण करतोय? केवळ सामाजिक प्रतिष्ठेसाठी आपल्या मुलीला मनपसंत श्रीमंत स्थळ बघतोय. आणि आपल्या मुलीचे लग्न एकदाचे उरकून टाकतोय. म्हणूनच आजकाल समाजात व गावात आपल्या मुलीला श्रीमंत घरी देण्याची प्रत्येक आई-वडिलांची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. त्यासाठी मुलींचे बिचारे आई-वडील दिवसभर शेतात जीवाचे रान करतात. वीट भट्टीची किंवा उसाची उचल घेऊन पैसा गोळा करतात, नसेल तर सावकाराचे कर्ज काढतात आणि ऐपत नसताना देखील केवळ सामाजिक प्रतिष्ठेसाठी मुलाला मनमानी हुंडा देऊन आपल्या मुलीला मोठ्या घरी देतात.

सोनं नाणं देऊन मुलांच्या सर्व इच्छा पूर्ण करतात. लग्न राजेशाही थाटात लावून देतात. लग्नाला गाव जेवण देतात. सर्व पाहुणे रावळे बोलावतात. आणि आपली व आपल्या मुलीची एकदाची हौस पूर्ण करतात. मुलगी नवऱ्या घरी नांदायला जाते. एक-दोन महिने नवरा व सासू-सासरे तिला चांगली वागणूक देतात. पोटच्या मुलीप्रमाणे सांभाळतात. तिला खूप खूप जीव लावतात.

तिकडे मुलीचे आई-वडील मात्र आता आपली मुलगी सुखाने व आनंदाने नांदत आहे म्हणून समाधानी असतात. त्या दोघांचा संसार सुखाने चालत असतो. पण त्यांच्या सुखी संसाराला कोणाची कुठून व कशी नजर लागते हे कळायला मार्ग नसतो. त्या मुलीचा नवरा दारुडा व व्यसनी निघतो. तिथूनच मुलीचा मानसिक व शारीरिक छळ सुरू होतो.

तिच्या बावनकशी चारित्र्यावर संशय घेतला जातो. तिला नाहक नावे ठेवून बदनाम केले जाते. नवरा रोज दारू पिऊन येतो आणि तिला मारहाण करतो. तिला घाण घाण शिव्या देऊन तिच्या भावना दुखावतो. तुझ्या आई-वडिलांनी मला लग्नात काय दिले? तुझ्या आई वडिलांनी मला लग्नात खूप कमी हुंडा दिलाय. आता आणखीन हुंडारुपी म्हणून काहीतरी पैसे किंवा गाडी घेऊन द्यायला सांग. नाहीतर तू आमच्या घरातून निघून जा आणि तुझ्या आई-वडिलांकडेच जाऊन रहा. इकडे आमच्याकडे येऊ नकोस. अशा मागणीचा तगादा मुलीकडे लावतात, छळ करून तिला घरातून बाहेर काढतात आणि माहेरचा रस्ता दाखवतात.

ती बिचारी मुलगी मात्र आपल्या आई-वडिलांकडे जाते. आणि त्यांना सर्व हकीकत सांगते. तेव्हा आई-वडिलांना हे ऐकून खूप खूप दुःख वाटते. मुलीच्या आई वडिलांच्या मनात तर वेगळ्याच अपेक्षा राहतात. पण इथे तर वेगळेच काहीतरी होऊन जाते. त्यांच्या पायाखालची जमीन सरकते. त्यांना आभाळ फाटल्यासारखे होते. एवढे अतोनात दुःख त्यांना होते. आणि मग ते पश्चातापात पडतात. स्वतःला दोष देत बसतात.

आता आपल्याला समाज काय म्हणेल? भावकी व नातेवाईक काय म्हणतील? या विचारांनी ते हतबल होतात. हे प्रकार सध्या सर्वत्र सुरू आहेत. नुकतेच घडलेले वैष्णवी हगवणे प्रकरण सध्या महाराष्ट्रात गाजत आहे. हे आपल्याला माहित आहे. वैष्णवी हगवणे हिला तिच्या आई-वडिलांनी मायंदळ हुंडा देऊन तिला श्रीमंत घरी दिले होते. पण श्रीमंत घरी तिच्यावर तिच्या नवऱ्याने व सासू-सासऱ्याने कसा अमानुषपणे मानसिक व शारीरिक छळ केला. हे आपण जाणून आहोत.

आई-वडिलांना चांदीचे भांडे घेऊन द्यायला सांग म्हणून तिच्यावर वारंवार अमानुषपणे अत्याचार केला जात होता. नाहक तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला बदनाम केले जात होते. या रोजच्या शारीरिक व मानसिक छळाला कंटाळून तिने आपली जीवनयात्रा संपवली. ही महाराष्ट्राला हादरवून टाकणारी घटना आहे. याचा प्रत्येक आई-वडिलांनी जरूर विचार करावा.

मुलगी श्रीमंत घरी दिल्यावरच सुखी राहते हा आई-वडिलांचा गैरसमज आहे. हा गैरसमज प्रत्येक आई-वडिलांनी मनातून काढून टाकावा. आपली मुलगी श्रीमंत घरी द्या किंवा गरीब घरी द्या याला माझा विरोध नाही. पण मुलगी केवळ श्रीमंत घरीच सुखी राहील हे मीच काय? कोणीही सांगू शकत नाही. जो मुलगा निर्व्यसनी व होतकरू आहे आणि आपल्या मुलीला आयुष्यभर चांगल्या प्रकारे जीव लावून सांभाळू शकतो अशाच निर्व्यसनी, होतकरू व चारित्र्यसंपन्न मुलाला आपली मुलगी जरूर द्या. तो आपल्या मुलीला राणी सारखा ठेवेल...त्यांच्या सुखी संसाराला कोणाचीच नजर लागणार नाही. आणि श्रीमंत घरी द्याल तर आपल्या मुलीचे वैष्णवी हगवणे प्रकरण झाल्याशिवाय राहणार नाही... एवढे ध्यानात ठेवा...


---

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी, ता.अहमदपूर, जि. लातूर**
**७४९८७१५६६१**

■ ■ ■

# लाडक्या बहिणींसाठी दारूधोरण





दिपक कैतके
मुंबई.

माझी लाडकी बहीण योजनेचा हप्ता वेळेवर देण्यासाठी आता राज्य सरकारने दारूबंदेलाच नवा अर्थ दिला आहे. राज्याच्या इतिहासात प्रथमच सर्व प्रकारच्या मद्यावर तब्बल ५०% पेक्षा अधिक करवाढ करून महसूलवाढीचा दारूचा उपाय मंत्रिमंडळाने मंजूर केला आहे. या निर्णयामुळे राज्याच्या तिजोरीत दरवर्षी सुमारे १४ हजार कोटी रुपये भर पडणार असून, परकीय मद्यावर तर ७० टक्क्यांपर्यंत दरवाढ करण्यात आली आहे.

**लाडक्या बहिणींसाठी खडखडाट मग दारूपट्टीचे टॉनिक!**

राज्य सरकारने महिलांसाठी जाहीर केलेल्या माझी लाडकी बहीण योजनेसाठी दरमहिना १५०० रुपये आणि भविष्यात २१०० रुपये देण्याची घोषणा केली होती. मात्र, या योजनेसाठी लागणाऱ्या ३५ ते ४० हजार कोटींच्या वार्षिक खर्चामुळे सरकारला आर्थिक तंगीतून मार्ग काढावा लागतो आहे. परिणामी, राज्य उत्पादन शुल्क विभागाने दारूच्या दरांमध्ये भरमसाठ वाढ करण्याचा निर्णय घेतला आणि मंत्रिमंडळाने त्यावर शिक्कामोर्तब केलं.

**देशी-विदेशी मद्यावर एकदम हैवाना दरवाढ**

| मद्य प्रकार | जुना दर (१८० मि.ली.) | नवा दर | वाढ (%) |
|---|---|---|---|
| देशी दारू | रू.७० | रू.८० | १४% |
| महाराष्ट्रात निर्मित दारू | रू.१४८ | – | |
| भारतीय बनावटीचे विदेशी मद्य | रू.१२० | रू.२०५ | ७०% |
| प्रिमियम विदेशी मद्य | रू.२१० | रू.३६० | ७०% |

सर्वसामान्य ग्राहकांपासून प्रिमियम ब्रँडचे चाहते सर्वांनाच याचा फटका बसणार असून, मुंबईतील हॉटेल्स व रेस्टॉरंट्समध्ये विदेशी मद्य विक्रीसाठी १५% अतिरिक्त शुल्क आकारले जाणार आहे. बीयर मात्र यापासून वगळण्यात आली आहे, कारण देशात सर्वाधिक बीयर दर आधीच महाराष्ट्रातच आहेत.

**दारूपासून आता राज्याच्या तिजोरीत भरभरून राजस्व**

सध्या उत्पादन शुल्क व दारू विक्रीतून राज्याला ४५ हजार कोटींचा वार्षिक महसूल मिळतो. आता नव्या दरवाढीनंतर हा महसूल ६० हजार कोटींवर जाण्याची शक्यता आहे. यामुळे राज्याच्या महसुली उत्पन्नाच्या १० टक्क्यांहून अधिक वाटा केवळ दारू विक्रीतून मिळणार आहे.

**विभागीय बळकटी व एआय नियंत्रण**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या यंत्रणेसाठी ७४४ नवीन पदे व ४७९ पर्यवेक्षक पदे मंजूर करण्यात आली आहेत. तसेच एआय प्रणालीद्वारे संपूर्ण मद्य उत्पादन-साखळीवर लक्ष ठेवण्यासाठी एकात्मिक नियंत्रण कक्ष स्थापन केला जाणार आहे. महायुती सरकारच्या महिलांसाठीच्या लोकप्रिय योजनेला आर्थिक बळ देण्यासाठी राज्यातील दारू प्रेमींना आता अधिक मोल मोजावे लागणार आहे. एका बाजूला लाडक्या बहिणींची काळजी, दुसऱ्या बाजूला दारूचे वाढते दर – हे सध्याच्या सरकारचे नवे आर्थिक समीकरण ठरू लागले आहे.

## वाचक लिहितात

### रेल्वेचा पुढाकार, शिक्षण क्षेत्र मागे का?

छत्रपती शिवाजी महाराज केवळ भारतीयांचेच नव्हे, तर परदेशातही आराध्य आहेत. अनेक देशांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये शिवरायांची युद्धनीती, राज्यनीती इत्यादींचा समावेश आहे. शिवाजी महाराज केवळ हिंदवी स्वराज्याचे संस्थापक नव्हते, तर ते कुशल प्रशासक, पराक्रमी योद्धा आणि दूरदृष्टी असलेले शासक होते. ते जनकल्याण आणि आत्मनिर्भरतेचे प्रतीक आहेत.

त्यांची युद्धनीती, शासनपद्धती आणि धर्मनिरपेक्ष धोरण आजही प्रेरणादायी आहेत. त्यांच्या जीवनातून आणि कायार्तून विद्यार्थ्यांना नेतृत्वगुण, देशभक्ती आणि सामाजिक ऐक्य यांसारखी मूल्ये शिकायला मिळावी. या उद्देशाने मुंबई येथून ह्यभारत गौरव टुरिस्ट ट्रेन अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज सर्किट या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला आहे.

ही गाडी महाराष्ट्रात ५ दिवस फेरफटका मारणार असून रायगड, प्रतापगड, पन्हाळा अशा ऐतिहासिक गडांच्या जवळच्या रेल्वेस्थानकांवर तसेच शिवरायांच्या इतिहासाशी संबंधित अन्य ऐतिहासिक स्थळांजवळ थांबणार आहे.या अभिनव उपक्रमासाठी भारतीय रेल्वेचे अभिनंदन!

रेल्वे विभागाने शिवचरित्र प्रचारासाठी पुढाकार घेतला आहे, पण शिवरायांचा वसा पुढील पिढीमधे रुजविण्यासाठी शिक्षण क्षेत्रानेही पुढाकार घेण्याची वेळ आली आहे.

केवळ राज्य सरकारच नव्हे, तर केंद्र सरकारनेही प्राथमिक इयत्तेपासून पदव्युत्तर अभ्यासक्रमांपर्यंत शिवाजी महाराजांचे जीवन, कार्य व पराक्रम यांचा समावेश अभ्यासक्रमात करावा, ही सर्व शिवप्रेमींची इच्छा आहे.

■ दीपक जमनारे, वर्धा.

# नसांमध्ये साचलेले खराब कोलेस्ट्रॉल होईल कमी



आजकाल उच्च कोलेस्ट्रॉलची समस्या सामान्य झाली आहे. लोकांची बदलती जीवनशैली तसेच खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी यामुळे ही समस्या उद्भवते. शरीरात कोलेस्ट्रॉलची पातळी वाढल्याने अनेक गंभीर आजार होऊ शकतात. हृदयरोग, मज्जातंतूंचे आजार, हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकसारखे गंभीर आणि जीवघेणे आजार होऊ शकतात. त्यामुळे शरीरात वाढत्या कोलेस्टेरॉलची समस्या वेळीच नियंत्रित करणे महत्त्वाचे आहे.

वाढत्या कोलेस्टेरॉलवर नियंत्रण ठेवण्यासाठी जीवनशैलीत काही बदल करणे आणि आहार सुधारणे आवश्यक आहे, अनेक प्रकरणांमध्ये यासाठी औषधे घ्यावी लागतात. मात्र काही घरगुती उपायांच्या मदतीने शरीरात साठलेले खराब कोलेस्टेरॉल बाहेर काढू शकतात.

उच्च कोलेस्ट्रॉलची समस्या असेल, तर ते नियंत्रित करण्यासाठी स्वयंपाकघरात असलेली एक पांढरी गोष्ट वापरावी लागेल.

**लसूण कोलेस्ट्रॉल साफ करेल**

वाढत्या कोलेस्ट्रॉलवर नियंत्रण ठेवण्यासाठी लसूण वापरू शकता. यासाठी लसूण तुपात भाजून खावा लागेल. तूप आणि लसूण एकत्र कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतात. लसणात असलेले अँटी-ऑक्सिडंट्स आणि तुपात असलेले ओमेगा-३ फॅटी ॲसिड कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतात. याशिवाय, तुपात भाजलेला लसूण आरोग्यासाठी बरेच फायदे प्रदान करते.

जर पचनाच्या समस्या असतील तर लसूण फायदेशीर ठरेल. विशेषतः तुपामध्ये ते भाजून खाल्ल्याने पचनाच्या समस्या दूर होण्यास खूप मदत होते. यामुळे बद्धकोष्ठता आणि आम्लपित्त यापासूनही आराम मिळतो. लसणात असे अनेक पोषक घटक आढळतात जे हृदय निरोगी ठेवण्यास मदत करतात. तुपात तळलेला लसूण खाल्ल्याने हृदयाशी संबंधित आजार दूर राहतात.

तुपात तळलेला लसूण खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढते. ते शरीराचे संसर्गापासून संरक्षण करते. तसेच लसणात असलेले अँटी-फंगल आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म तुपासोबत मिसळल्यास सर्दी आणि खोकल्यापासून आराम मिळतो.

**पुरुषांसाठी फायदेशीर**

तुपात भाजलेले लसूण पुरुषांसाठी खूप फायदेशीर मानले जाते. नियमित सेवन केल्यास टेस्टोस्टेरॉनची पातळी वाढते आणि शुक्राणूंची संख्या वाढते.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



# डोळस विचार

अरे डोळस बांधवांनो
अंधांच्या समस्यांची
ठेवा थोडी जाणीव
बंद डोळ्याने चालून पहा
समजेल तुम्हा उणिव ...

असेल दृष्टी तर
दिसेल सृष्टी
म्हणवा नाही खोटा
मरणोत्तर नेत्रदान करून
अंधांना दृष्टी देण्यात
सांगा काय आहे तोटा ?

## आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफने पारंपरिक पॉलिसींवर ९०० कोटींपेक्षा अधिक कर्ज वितरित

**नागपूर, ११ जून :** आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ इन्शुरन्सने आर्थिक वर्ष २०२५ मध्ये पारंपरिक अर्थात ट्रॅडिशनल पॉलिसींवर ग्राहकांना ९०० कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज वितरित केले आहे. पॉलिसीवर कर्ज हे उपयुक्त सुविधा असून, यामुळे ग्राहकांना त्वरित निधी मिळतो आणि त्यांच्या दीर्घकालीन बचत योजनेवर कोणताही परिणाम होत नाही. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये कंपनीने ४२,७०० पेक्षा अधिक ग्राहकांना कर्ज दिले.

आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ इन्शुरन्सचे चीफ ऑपरेशन्स ऑफिसर श्री. अमीश बँकर यांनी सांगितले, लाईफ इन्शुरन्स हे दीर्घकालीन उत्पादन आहे आणि पॉलिसी सुरु असताना ग्राहकांना आर्थिक अडचणी येऊ शकतात. पॉलिसीवर कर्ज ही सुविधा ग्राहकांची बचत योजना योग्य ट्रॅकवर ठेवण्यास मदत करू शकते. विशेष म्हणजे, ग्राहकांना त्यांच्या पॉलिसीच्या सरेंडर व्हॅल्यूच्या ८०% पर्यंत कर्ज घेता येते. पॉलिसीवर कर्ज घेण्याची प्रक्रिया पेपरलेस आणि जलद आहे. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये ९८% पेक्षा अधिक कर्ज २४ तासांच्या आत वितरित करण्यात आले. ग्राहक कंपनीच्या वेबसाइटवर किंवा मोबाईल ॲपवर कर्जासाठी अर्ज करू शकतात.

आमच्या ग्राहकांनी पॉलिसीवर कर्ज या सुविधेचा मोठ्या प्रमाणात स्वीकार केला आहे. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये कर्ज वितरणामध्ये ६०% वाढ झाली आहे. आमचे ग्राहक दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी वचनबद्ध आहेत आणि त्यांनी हे उत्पादन ज्या आर्थिक उद्दिष्टांसाठी घेतले, ते साध्य करू इच्छितात हे यातून दिसून येते.

विशेष म्हणजे, हे कर्ज प्रीमियम भरण्यासाठीही वापरता येते, ज्यामुळे पॉलिसी चालू राहते आणि तिचे फायदे ग्राहकांना मिळत राहतात.

## जगातील सर्वात मोठे कंटेनर जहाज एमएससी इरिनाचे विझिंजम आंतरराष्ट्रीय बंदरात ऐतिहासिक पदार्पण

**अहमदाबाद, १० जून :** जगातील टीईयू (ट्वेंटी-फूट इक्विव्हलेंट युनिट) क्षमतेनुसार सर्वात मोठे कंटेनर जहाज म्हणून ओळखले जाणारे एमएससी इरिना हे जहाज सोमवारी सकाळी विझिंजम आंतरराष्ट्रीय बंदरात दाखल झाले आणि ते मंगळवारपर्यंत तेथे थांबणार आहे.

या कंटेनर जहाजाचं आगमन या बंदरासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २ मे रोजी हे बंदर राष्ट्राला समर्पित केले होते.

एमएससी इरिना ची एकूण क्षमताच २४,३४६ टीईयू (२० फूट समतुल्य युनिट) असून, हे जहाज जागतिक शिपिंग क्षेत्रातील एक शक्तिशाली घटक आहे. याची लांबी ३९९.९ मीटर आणि रुंदी ६१.३ मीटर आहे. हे जहाज फिफाद्वारे मान्यताप्राप्त मानक फुटबॉल मैदानापेक्षा जवळजवळ चारपट लांब आहे.. हे जहाज आशिया आणि युरोपदरम्यान मोठ्या प्रमाणात कंटेनर वाहतुकीसाठी खास डिझाइन करण्यात आले असून, व्यापार मार्ग सुलभ करणे आणि लॉजिस्टिक



कार्यक्षमतेत वाढ करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

हे जहाज दक्षिण आशियातील बंदरात प्रथमच आले आहे, ज्यामुळे विझिंजम बंदराची अल्ट्रा-लार्ज कंटेनर व्हेसेल्स (युएलसीव्ही) हाताळण्याची क्षमता अधोरेखित होते. या बंदरात याआधीही एमएससी तुर्कीए आणि एमएससी मिशेल कॅपेलिनी यांसारखी आयकॉन-क्लास जहाजे आली आहेत, ज्यामुळे हे बंदर सागरी व्यापारातील एक महत्त्वाचे केंद्र ठरत आहे.

एमएससी इरिना' मार्च २०२३ मध्ये लाँच करण्यात आले आणि त्याच वर्षी एप्रिलमध्ये त्याचा पहिला प्रवास सुरू झाला. हे जहाज एकाच वेळी २६ (टियर उंचीपर्यंत) थरांमध्ये कंटेनर साठवू शकते, जे कंटेनर स्टॅकिंगमध्ये एक अद्वितीय क्षमता दर्शवते.

लक्षवेधी बाब म्हणजे एमएससी इरिनाने आपल्या पूर्ववर्ती 'ओओसीएल स्पेन' ला १५० टीईयूच्या फरकाने मागे टाकले आहे. पर्यावरणीय मानकांना अनुसरून, या जहाजात ऊर्जा-बचतीसाठी विशेष वैशिष्ट्ये आहेत, ज्यामुळे कार्बन उत्सर्जनात सुमारे ४% घट होते आणि कार्यक्षमतेवर परिणाम न करता पर्यावरणाचा भार कमी होतो.

एमएससी एरिनाचे विझिंजम बंदरातील आगमन केवळ या बंदराचे जागतिक शिपिंगमधील धोरणात्मक महत्त्व अधोरेखित करत नाही, तर सस्टेनेबल मेरीटाइम प्रॅक्टिसेसकडे एक महत्त्वाची झेप दर्शवते आणि या क्षेत्रातील भविष्यातील विकासासाठी एक नवीन मानदंड तयार करते.

## कलाकारांनी सांगितल्या फादर्स डेबाबतच्या हृदयस्पर्शी आठवणी!



**मुंबई, ११ जून :** फादर्स डे वडिलांचे प्रेम, त्याग आणि अविरत पाठिंब्याचे हृदयस्पर्शी सेलिब्रेशन आहे. या दिवशी मुले आपुलकी, गोड आठवणी आणि विचारशील गेस्चर्सचे प्रतीक म्हणून वडिलांचा सन्मान करतात. यंदा फादर्स डे निमित्त एण्ड टीव्ही कलाकार जुन्या आठवणींना उजाळा देत आहेत, तसेच हृदयस्पर्शी गाथा सांगत आहेत, ज्यामधून पितृत्वाचा आनंद व अभिमान दिसून येतो. हे कलाकार आहेत योगेश त्रिपाठी (दरोगा हप्पू सिंग, 'हप्पू की उलटन पलटन') आणि रोहिताश्व गौड (मनमोहन तिवारी, 'भाबीजी घर पर है'). दरोगा हप्पू सिंग म्हणून लोकप्रिय असलेले योगेश त्रिपाठी म्हणाले, ''माझी दोन मुले माझे विश्व आहेत आणि माझ्या जीवनात त्यांचे असणे खूप आनंद देते. काही वर्षांपूर्वी माझा मुलगा दक्षेशने, जो लहान हप्पू बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे, मला प्रेमळ सरप्राइज दिले. त्याने हप्पू सिंगप्रमाणे अगदी हुबेहूब माझ्यासारखा पेहराव केला, जेथे सुव्यवस्थित विंचरलेले केस, सिग्नेचर मिशी आणि लहान 'न्योछावर' पॉकेट देखील होते. तो माझ्या प्रमाणे उच्चार आणि आत्मविश्वासाने म्हणत होता, 'न्योछावर कर दो', जे पाहून आम्ही सर्व अचंबित झालो. मी हसत होतो आणि सोबत माझ्या डोळ्यांमध्ये आनंदाश्रू आले होते. त्या क्षणी मी माझा सर्वात मोठा चाहता आणि माझा सर्वात मोठा समीक्षक पाहिला. ते अनुकरण, निरागसता, प्रेम आणि उत्साह पाहून मी खूप भारावून गेलो.''

## मेट्रोपोलिस हेल्थकेअरचा विदर्भात विस्तार गोंदिया येथे आधुनिक डायग्नोस्टिक लॅबची स्थापना

**गोंदिया, १० जून :** भारतातील दुसऱ्या क्रमांकाची आणि अत्यंत प्रतिष्ठित पॅथॉलॉजी साखळी असलेल्या मेट्रोपोलिस हेल्थकेअर लिमिटेडने विदर्भात आपली उपस्थिती आणखी भक्कम करत गोंदिया येथे उच्च तंत्रज्ञानयुक्त डायग्नोस्टिक लॅब सुरू केली आहे. राष्ट्रीय स्तरावर गोंदिया जिल्ह्यात लॅब सुरू करणारी मेट्रोपोलिस ही पहिली प्रमुख डायग्नोस्टिक कंपनी आहे. सुमारे १,००० चौरस फूट क्षेत्रफळ असलेली ही लॅब प्रत्येकी महिन्याला ६,००० सॅम्पल्स तपासण्याची क्षमता बाळगते आणि रुटीन तपासण्यांपासून ते ॲडव्हान्स मॉलेक्युलर डायग्नोस्टिक्सपर्यंत सेवा पुरवते.



या लॅबचे उद्घाटन मेट्रोपोलिस हेल्थकेअर लिमिटेडचे चीफ बिझनेस ऑफिसर (पश्चिम, मध्य व उत्तर भारत) भूपेंद्रसिंह राजावत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्री. राहुल कावणकर (एव्हीपी व बिझनेस युनिट हेड रेस्ट ऑफ महाराष्ट्र), डॉ. स्मिता सुदके (चीफ ऑफ लॅब पुणे व रेस्ट ऑफ महाराष्ट्र), डॉ. पूजा बांबोर्डे (चीफ ऑफ लॅब गोंदिया) आणि श्री. विक्रांत पवार (क्लस्टर सेल्स मॅनेजर) हेही उपस्थित होते.

भूपेंद्रसिंह राजावत म्हणाले, गोंदिया ही मेट्रोपोलिसची विदर्भातील पाचवी डायग्नोस्टिक लॅब आहे. यापूर्वी नागपूर, अमरावती, अकोला आणि चंद्रपूर येथेही आमच्या सुविधा आहेत. मागील चार दशकांपासून महाराष्ट्रात आम्ही दर्जेदार आरोग्यसेवा देत आहोत. टियर २ व टियर ३ शहरांमध्ये अचूक, जलद आणि विश्वासार्ह निदान सेवा देणे हे आमचे ध्येय आहे. स्थानिक हॉस्पिटल्स, डॉक्टर व सार्वजनिक आरोग्य व्यवस्थांबरोबर भागीदारी करत आरोग्य सुधारण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.

डॉ. स्मिता सुदके म्हणाल्या, गोंदिया येथे उभारलेल्या या लॅबमुळे मेट्रोपोलिसच्या वैज्ञानिक गुणवत्ता व विशिष्ट निदान सेवेचा लाभ स्थानिक लोकांपर्यंत पोहोचेल. ही लॅब वेलनेस तपासणी, क्रॉनिक डिजीज मॉनिटरिंग, तसेच गॅस्ट्रोएंटेरॉलॉजी, नेफ्रॉलॉजी, न्यूरॉलॉजी, ऑन्कॉलॉजी, महिला व बाल आरोग्य, संसर्गजन्य रोग आदी क्षेत्रांतील सखोल निदानासाठी उपयुक्त ठरेल. अचूक निदान, नाविन्यपूर्ण दृष्टिकोन व रुग्ण-केंद्रित सेवा ही आमची मूलभूत मूल्ये आहेत.

ही नवी लॅब गोंदिया येथील गांधी चौक, अग्रसेन गेटजवळील राईस सिटी बिल्डिंगमध्ये कार्यरत झाली आहे.

मेट्रोपोलिस हेल्थकेअर ही भारतातील सर्वाधिक विश्वासार्ह डायग्नोस्टिक साखळी असून अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्रांची मानकरी आहे. या संस्थेने भारतीय संदर्भ रेंज विकसित केली आहे, जी आज देशभरातील हजारो लॅब्समध्ये वापरली जाते.

## तनेएराने जाहीर केली पहिल्यांदाच साड्यांवर ४०% सवलत आर्थिक वर्ष २५ मध्ये साध्य केलेल्या ३०% वाढीच्या आधारावर मजबूत सुरुवात

**नागपूर, ११ जून :** टाटाचा ब्रँड असलेल्या तनेएराने आर्थिक वर्ष २५ मध्ये सुमारे ३०% वाढ नोंदवली असून आर्थिक वर्ष २६ च्या सुरुवातीलाही लग्नसराईच्या मजबूत खरेदीचा प्रभाव आहे. त्यातून ब्रँडच्या वाढीचा कल, प्रवाह कायम राहत आहे. या सकारात्मक प्रवासास चालना देत तनेराने आपल्या पहिल्यावहिल्या राष्ट्रीय सेलची घोषणा केली आहे. त्यामध्ये साड्या, रेडी-टू-वेअर सेट्स, अनस्टीच्ड कुर्ता सेट्स आणि सणासुदीसाठीच्या लेहेंगासारख्या विविध श्रेणींमध्ये तयार केलेल्या शुद्ध व नैसर्गिक धाग्यांपासून बनवलेल्या उत्पादनांवर ४०% पर्यंत सवलत दिली जात आहे.

४१ शहरांमध्ये ८० दालनांचे मजबूत राष्ट्रीय जाळे असलेल्या तनेएराने पारंपरिक वस्त्रप्रावरण परिधानसाठी प्रमुख पर्याय म्हणून आपले स्थान अधिक दृढ केले आहे. यावर्षी सणासुदीचा हंगाम लवकर सुरु होत असताना हा सेल या हंगामाची सुरुवात झाल्याचे जाहीर करण्यासाठी आणि ग्राहकांना तनेएराच्या वैशिष्ट्यपूर्ण डिझाइन ठळकपणे सिद्ध करणाऱ्या शुद्ध आणि अस्सल उत्पादनांचा संग्रह करण्याची संधी देण्यासाठी आयोजित करण्यात आला आहे.

या प्रसंगी बोलताना मुख्य विक्री आणि विपणन अधिकारी सोमप्रभ कुमार सिंग म्हणाले, पहिल्यांदाच इतक्या विस्तृत श्रेणीवर आम्ही एवढी सवलत देत असून उत्पादने ४०% पर्यंत सवलतीत उपलब्ध आहेत. ही सवलत योजना म्हणजे तनेएरा ब्रँड ज्यासाठी ओळखला जातो त्या शुद्धता व समृद्धतेच्या अनुभवाबरोबर मिळणारा एक अतिरिक्त लाभ आहे. अस्सलरीत्या मिळवलेली हस्तकला उत्पादने तसेच प्रत्येक पोषाखात मिळणारी शुद्धतेची आणि गुणवत्तेची हमी याद्वारे आमच्या चोखंदळ ग्राहकांसाठी हा अनुभव खास बनविण्याचे आमचे ध्येय आहे.

बनारसी, कांजीवरम, जामदानी ते टसर यांसारख्या विविध प्रकारच्या साड्या ब्रँडच्या पोतडीत असून त्या भारतातील विणकाम परंपरा जपणाऱ्या कारागिरांना एक सलाम आहे. प्रत्येक तनेएरा दालन साडीप्रेमींसाठी एक निवासस्थानासारखे डिझाइन केलेले असून येथे लग्नासाठी विशेष विभाग, सणासुदीच्या कार्यक्रमाच्यावेळी परिधान करायच्या कपड्यांचा वेगळा विभाग आणि रोजच्या वापरातील आवश्यक गोष्टी एकाच छताखाली उपलब्ध आहेत. ग्राहकांसाठी सिल्क, कॉटन इकत, कोटा डोरिया, चंदेरी आणि महेश्वरी, साउथ सिल्क्स, संबळपुरी आणि व्हेगन कलेक्शन्ससारख्या विविध विणकाम केंद्रांमधून खास निवडलेली उत्पादनेही उपलब्ध आहेत. हर एक पोषाखातून भारताच्या समृद्ध वस्त्र परंपरेचा गौरव करत गुणवत्तेच्याबाबतीत तडजोड न करणाऱ्या तनेएरा कडून अस्सल कारागिरीचे चिन्ह म्हणून शुद्ध झारी कांजीवरम असे प्रमाणपत्र दिले जाते. ग्राहक स्टेशन रोड, नागपूर येथील तनेएरा शोरूम मध्ये ही सवलत घेऊ शकतात.

## भारती सिंहने शब्बीर अहलूवालियाला टेलिव्हिजनचा अजय देवगण म्हटले



**मुंबई, ११ जून :** मनोरंजन क्षेत्रातील एक लोकप्रिय जोडी भारती सिंह आणि हर्ष लिंबाचिया यांनी अलीकडेच आपल्या एलओएल पॉडकास्टमध्ये टेलिव्हिजन वरील लाडका चेहरा शब्बीर अहलूवालिया आणि आशी सिंह या दोघांना आमंत्रित केले होते. शब्बीर आणि आशी सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत युग आणि कैरी या अगदी विरुद्ध स्वभावाच्या व्यक्तिरेखा साकारत आहेत. या पॉडकास्टमध्ये त्या दोघांनी शूटिंग दरम्यान पडद्यामागे घडलेल्या गमतीजमती, किस्से, त्यांची पडद्यावरची केमिस्ट्री आणि या मालिकेच्या वेगळेपणाविषयी हितगुज केले.

शब्बीरच्या व्यक्तिमत्त्वाचे भारती सिंहने तोंड भरून कौतुक केले. तो एक ज्येष्ठ अभिनेता आहे आणि बऱ्याच वर्षांपासून टेलिव्हिजनवर काम करत असल्याने तिने आशी सिंहला शब्बीरसोबत काम करण्याचा अनुभव कसा आहे हे विचारले. भारती पुढे म्हणाली की तिला शब्बीर हा टेलिव्हिजनचा अजय देवगण वाटतो, कारण तो फारसा हसत नाही. त्याची चर्या गंभीर असते आणि परफॉर्मन्स उत्कट असतो. तिने आशीला हे देखील विचारले की शब्बीरसोबत पहिले दृश्य करताना तिला भीती वाटली होती का.

या हलक्या फुलक्या क्षणांमुळे स्टुडिओत हशा पिकला. सुरुवातीला या कसलेल्या कलाकारासोबत काम करताना आपल्याला कशी भीती वाटत होती, हे आशी सिंहने सांगितले. पण शब्बीरच्या साधेपणामुळे आणि आपलेपणामुळे कामात लवकरच मोकळेपणा आला असेही ती म्हणाली.

## तेनाली रामा मालिकेत तेनाली आणि लक्ष्मण तडकणाऱ्या काचांच्या मागचे रहस्य शोधणार



**मुंबई, ११ जून :** सोनी सबवरील तेनाली रामा ही मालिका तेनाली (कृष्ण भारद्वाज) या चतुर दरबारी कवीच्या सुरस कथा सादर करून प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. तेनालीला आता लक्ष्मणची (कुणाल करण कपूर) साथ मिळाली आहे. ते दोघे मिळून विजयनगरात घडणाऱ्या गूढ घटनांचा छडा लावत आहेत.

आगामी भागांमध्ये, विजयनगरात विचित्र गोष्टी घडताना दिसतील. संपूर्ण शहरात अचानक रहस्यमय रीतीने काचा फुटू लागतील. रामा शोध घेतो, तेव्हा त्याच्या ध्यानात येते की, या रहस्याचे केंद्र आचार्य भास्कर (विनायक भावे) यांच्या घरात आहे. आचार्य भास्कर एक वेंधळा संशोधक आहे. जेव्हा तेनाली गायब झालेल्या आचार्यांचा शोध घेऊ लागतो आणि काचा फुटण्यामागचे गूढ शोधू लागतो, तेव्हा एका लपलेल्या घुसखोराशी त्याचा सामना होतो. या झटापटीत तेनालीच्या जीवाला धोका निर्माण होतो, त्यावेळी लक्ष्मण प्रकट होतो आणि हल्लेखोरापासून त्याचे रक्षण करतो. त्यांना लक्षात येते की भास्करचा जीव धोक्यात आहे. रामा आणि लक्ष्मण आणखी कसून शोध घेऊ लागतात. त्यांच्याकडे वेळ कमी आहे आणि आचार्य भास्करला वाचवणे आवश्यक आहे. त्यासाठी या भयंकर कट रचणाऱ्याचा शोध त्यांना घ्यावा लागणार आहे.

## सागर पारेखने जागृति एक नयी सुबहच्या सेटवर आपल्या सहकलाकार आर्य बब्बर आणि विजयेंद्र कुमेरिया यांना घरी बनवलेले लिट्टी-चोखा खाऊ घालून एक खास ट्रीट दिली!



**मुंबई, ११ जून :** प्रत्येक मालिका त्यामधील पात्रांमधील केमिस्ट्रीवर फुलते मग ती भावनिक नाती असोत किंवा संघर्षमय. झी टीव्हीवरील जागृति एक नयी सुबह या मालिकेत सागर पारेख हा आर्य बब्बर (कलिकांत ठाकूर) आणि विजयेंद्र कुमेरिया (सूरज) यांच्यासोबत काम करत आहे आणि जसे हे तिघे ऑन-स्क्रीन एक आकर्षक कौटुंबिक नाते उभे करत आहेत, तसेच त्यांची ऑफ-स्क्रीन मैत्रीही तितकीच सुंदर आहे. अलीकडेच सागरने सेटवर आपल्या सहकलाकारांसाठी आणि क्रू सदस्यांसाठी एक सुंदर गोष्ट केली त्याने घरी बनवलेला लिट्टी-चोखा सर्वांसाठी आणला. हा त्याच्या मूळ गावचा एक पारंपरिक स्वादिष्ट पदार्थ आहे, ज्याने सर्वांनाच त्यांच्या घरची आठवण करून दिली.

प्रत्येकाने या पारंपरिक चवीचा आनंद घेतला आणि घरगुती स्वादाची प्रशंसा केल्याशिवाय राहूच शकले नाहीत. कलाकार आणि क्रूने जेवताना खूप मजा केली आणि भरभरून कौतुक केले, ज्यामुळे तो शूटिंगचा दिवस एक खास आठवणीत बदलला. सागरच्या या सुंदर कृतीमुळे केवळ पोटच भरलं नाही, तर त्यांच्यातील नातेही अधिक दृढ झाले.

## ओला इलेक्ट्रिकची स्टायलिश रोडस्टर एक्सची नागपूर डिलिव्हरी सुरू

नागपूर, ११ जून : भारतातील सर्वात मोठी इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही) कंपनी असलेल्या ओला इलेक्ट्रिकने आज नागपूर त्यांच्या रोडस्टर एक्स पोर्टफोलिओमधील मोटरसायकल्सची डिलिव्हरी सुरू केल्याची घोषणा केली. ओला इलेक्ट्रिक कंपनीने 'राइड द फ्युचर' मोहिमेअंतर्गत पहिल्या ५,००० ग्राहकांसाठी रुपये १०,००० च्या ऑफरची घोषणा केली आहे. यामध्ये ग्राहकांना एक्स्टेंडेड वॉरंटी, मुव्हओ यस प्लस आणि एसेन्शियल केअर मोफत मिळणार आहे.


रोडस्टर एक्स सिरीजमध्ये मिड-ड्राइव्ह मोटर आहे, जी कार्यक्षमता आणि सुरक्षितता वाढवते. रोडस्टर सिरीजच्या पॉवरट्रेनमध्ये चेन ड्राइव्ह आणि कार्यक्षम टॉर्क हस्तांतरणासाठी एकात्मिक एमसीयू (मायक्रोकंट्रोलर युनिट) देखील आहे, ज्यामुळे उत्कृष्ट एक्सलरेशन आणि सुधारित रेंज मिळते. रोडस्टर एक्स सिरीजमधील मोटरसायकल्समध्ये फ्लॅट केबल्सचा वापर करण्यात आला आहे - जी उद्योगातील पहिली नावीन्यपूर्णता आहे. या केबल्समुळे पॅकेजिंगची कार्यक्षमता सुधारते, वजन कमी होते आणि थर्मल कार्यक्षमता वाढते, ज्यामुळे एकूण टिकाऊपणा आणि विश्वसनीयता वाढते.

ओला इलेक्ट्रिकचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक भाविश अग्रवाल म्हणाले, स्कूटर्स ही फक्त सुरुवात होती. रोडस्टर एक्स हे मोटरसायकलिंग सेगमेंटमध्ये आमचे एक मोठे पाऊल आहे. रोडस्टर एक्स भारतात डिझाइन, इंजिनीअर आणि तयार केले आहे, ज्या पिढीला भविष्यातील बाईक चालवायची आहे त्यांच्यासाठी हे खास तयार केले आहे. आजपासून डिलिव्हरी सुरू झाल्याने, रोडस्टर एक्स २-चाकी श्रेणीतील ईव्हीची खरी क्षमता समोर आणेल, ज्यामुळे ईव्हीचा स्वीकार आणि वापर वाढवून येंड आएस येज शक्य होईल.

रोडस्टर एक्स सिरीज मोटरसायकल तंत्रज्ञानात एक क्रांती घडवून आणते आणि यात सेगमेंटमधील पहिले पेटंटेड ब्रेक-बाय-वायर तंत्रज्ञान सिंगल एबीएससह (अँटी-लॉक ब्रेकिंग सिस्टम) आणि प्रगत रीजनरेशन (पुनर्निर्मिती), क्रूझ कंट्रोल आणि रिव्हर्स मोड यांसारखी स्मार्ट मुव्हओ यस ५ वैशिष्ट्ये आहेत. रोडस्टर एक्स सिरीजच्या बॅटरी सिस्टिमला आयपी ६७ वॉटरप्रूफ आणि डस्ट-प्रूफ सर्टिफिकेशन मिळाले आहे, तसेच प्रगत वायर बॉन्डिंग तंत्रज्ञान आणि सहज देखभालीसाठी सर्व्हिसेबल बॅटरी मॅनेजमेंट सिस्टिम (बीएमएस) आहे.

रोडस्टर एक्स सिरीजच्या किमती रोडस्टर एक्स २.५ kWh साठी रुपये ९९,९९९, ३.५ साठी रुपये १,०९,९९९ आणि ४.५ kWh साठी रुपये १,२४,९९९ पासून सुरू होतात. रोडस्टर एक्स+ ४.५ kWh ची किंमत १,२९,९९९ आहे, तर रोडस्टर एक्स+ ९.१kWh (४६८० भारत सेलसह) जे प्रति चार्ज ५०१ किमीची अतुलनीय रेंज देते, त्याची किंमत रुपये १,९९,९९९ आहे.

## शब्दकोडे क्रमांक २१३५




आडवे शब्द :-
१) वृषभाचा सण
३) इंदिरा गांधीजींच्या नाव
७) देशाचे नाणे
९) मुलीचा नवरा
१०) सामान
११) व्यय
१२) गोंधळून जाणे
१४) चेष्टा
१६) आश्चर्य
१७) एक चतुर्थांश भाग
१८) अन्न, जेवण, गिळंकृत करणे
१९) जपान देशाचे चलन
२१) थोडक्यात महानगरपालिका
२३) माळी
२४) थंड
२५) गीत म्हणणे
२६) जहाज
२७) काल व उद्या मधील दिवस
२८) ताबडतोब(हिं )
२९) विशेष
३२) दुलई
३५) उगाच
३६) अनेकांच्या हाती असलेली सत्ता, गोंधळ
३९) गावाखालची जमीन
४१) धमनी
४२) चांदी
४४) अंबाड्यासारखी एक तंतुमय वनस्पती
४५) लापशी, दुधाचा एक गोड पदार्थ
४७) दही घुसळून केलेले पेय
४८) व्रत
४९) उसनवार
५२) भांडण, दुही
५३) मोठी उथळ वाटी
५४) तफावत, भेद
५५) जनक
५७) गुणांची कदर करणारा
६०) रेडा, कोकिळ
६२) तमाशातील आख्यान
६४) जिव्हा
६६) आपला देश
६८) सारथी
७१) नष्ट, नासाडी ७२) ऐट, दिमाख
७३) मरेपर्यंत
७४) न्यूनता, चणचण
७५) समीक्षा, विरोधी अभिप्राय

उभे शब्द :-
१) निर्बुद्ध माणूस
२) आगमन होणे
३) एक बारीक धान्य
४) खराब
५) लक्ष्मी
६) संगोपन
७) ख्रिश्चनांचे प्रार्थनास्थळ
८) श्रेष्ठ पुरुष
९) राबता, वहिवाट
११) गुप्तपणे चर्चा करण्याची जागा
१३) माल साठविण्याची जागा
१५) दारूचा एक प्रकार
१७) पुष्पदल
२०) एक मोठे चर्मवाद्य
२२) नगरात राहणारा
२४) ज्याला कशाचीही पारख नाही असा
२५) समुद्राच्या लाटांचा आवाज
२७) जनकजननी
३०) प्रभात
३१) रणात, युद्धात धीट असलेला
३३) धन्यवादाचा एक शब्द
३४) अकस्मात
३५) दुधाचे दह्यात रुपांतर करणारा घटक
३७) कासोटा, ओटी, खोकला
३८) हमाल
४०) लाकूड कापण्याचे हत्यार
४३) वेळूचे, किंवा गहू, जव यांचे सत्व
४६) गप्प बसण्याचे व्रत
४७) घाई त्वरा
५०) मंत्रीमंडळ, शासन - कर्त्यांचा समूह
५१) शेत, कुरण, मळा
५३) खळबळजनक
५४) अगदी छोटा भाग
५६) बारीक, मऊ केस
५८) दयाळू
५९) दरवाजा
६१) सदोदित
६३) तृण
६५) नासलेला
६६) गवताची पेंढी
६७) शरीर
६९) सत्ता
७०) नूतन

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## वीर हनुमानमध्ये आपले आराध्य दैवत श्रीरामाला भेटण्यास निघाला हनुमान

**मुंबई, ११ जून :** भक्ती आणि दिव्य नियती यांची हृदयस्पर्शी कथा विशद करून सोनी सबवरील वीर हनुमान मालिकेने आपल्या प्रेक्षकांना प्रभावित आणि प्रेरित केले आहे. या मालिकेत आन तिवारी छोट्या हनुमानाच्या भूमिकेत आहे, तर सायली साळुंखे आणि आरव चौधरी अनुक्रमे माता अंजनी आणि केसरीची भूमिका करत आहेत. तरुण खन्ना भगवान शिवाच्या रूपात दिसत आहेत आणि माहिर पांधी वाली आणि सुग्रीव यांची दुहेरी भूमिका करत आहे. मालिका आता एका दिव्य टप्प्यावर येऊन पोहोचली आहे. अलीकडच्या भागांमध्ये, प्रेक्षकांनी पाहिले की, हनुमान अयोध्येला पोहोचला आहे, पण हनुमान-श्रीरामाच्या (तन्मय नानी) भेटीत देव काही ना काही विघ्न उभे करत आहेत.

मनातील निःस्सीम भक्तीने प्रेरित झालेला हनुमान श्रीरामाला भेटण्यासाठी सतत एकामागून एक आलेल्या विघ्नांवर मात करत आहे. तो रानावनातून एकाकी, उपाशी भटकत आहे, भयंकर संकटे त्याच्यापुढे येत आहेत मात्र तरीही त्याचा निर्धार डळमळीत होत नाही आणि तो अत्यंत श्रद्धेने आपला प्रवास सुरूच ठेवतो. श्रीरामासाठी एक फुलांचा हार करण्याच्या त्याच्या प्रयत्नांत त्याच्यापुढे नवी विघ्ने उभी राहतात. आपल्या मार्गात त्याला एक गूढ पण दयाळू स्वभावाची व्यक्ती भेटते. ही व्यक्ती त्याला भक्तीचा गहन अर्थ जाणण्यास मदत करते. ही



व्यक्ती दुसरी तिसरी कुणी नसून भोला रूपातील साक्षात भगवान शिव असते, पण त्याबद्दल हनुमान मात्र अनभिज्ञ आहे. या भेटीनंतर हनुमानाला हे ज्ञान होते की, खरी भक्ती संपूर्ण शरणागतीत असते; आपला अहंकार, भीती आणि शंका सोडून देण्यात असते- आणि निर्मळ मनाने श्रीरामाच्या प्रेमाचा अनुभव घेण्यात असते.

भगवान शिवाची भूमिका करणारा अभिनेता तरुण खन्ना म्हणतो, जेव्हा जेव्हा मी रुद्राक्ष घालतो आणि महादेवाच्या भूमिकेत शिरतो, तेव्हा मनात एक जबाबदारीची जाणीव येते. मन श्रद्धेने भरून जाते. या भूमिकेसाठी केवळ संवाद बोलून आणि कृती करून चालत नाही, तर भगवान शंकरात असलेली अथांग शांतता, करुणा आणि विश्वव्यापक शक्ती देखील मनातून अनुभवावी लागते.

## आज का अंदाज

**गुरूवार १२ जून २०२५**

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ७ | ० | ४ | ५ | ८ | ९ |
| १५७ | ३३० | १३३ | ११८ | ४५५ | ४४७ | १३४ | १४४ |
| ४९० | ४४८ | २२३ | ५७८ | २४८ | ११३ | २६० | ५६८ |
| ५८० | २५९ | ३७७ | ६७७ | ३४६ | ६९० | ३७८ | ४७८ |
| ३२ | ६२ | ७५ | ०५ | ४३ | ५३ | ८१ | ९१ |
| ३४ | ६४ | ७८ | ०८ | ४६ | ५६ | ८२ | ९२ |
| ३० | ६० | ७९ | ०९ | ४७ | ५७ | ८० | ९० |

**१२ जून : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १० | २० | ५७ | ८७ |
| १४ | २४ | ५९ | ८९ |
| १६ | २६ | ५३ | ८३ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## राशीभविष्य

**मेष :** आज तुम्हाला अडकलेले पैसे मिळतील. काही महत्त्वाच्या कामात यश मिळाल्याने आर्थिक लाभ होतील. तुमच्या वडिलांकडून अपेक्षित आर्थिक मदत मिळेल. उत्पन्न वाढवण्याचे प्रयत्न यशस्वी होतील.

**वृषभ :** तुमच्या मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष द्या. तणाव कमी करण्यासाठी आणि स्वतःला फ्रेश ठेवण्यासाठी काळजी घ्या. कठीण परिस्थितीला सामोरे जाऊन त्यावर मात कराल.

**मिथुन :** आज कुटुंबात अनावश्यक तणाव निर्माण होऊ शकतो. तुम्ही तुमचा राग आणि कठोर शब्दांवर नियंत्रण ठेवावे. अन्यथा भांडणे गंभीर वळण घेऊ शकतात. तुम्हाला नोकरीच्या संधी मिळतील.

**कर्क :** तुमच्या बॉसशी बोलताना किंवा महत्त्वाच्या चर्चा करताना शहाणपणाने आणि विचारपूर्वक बोला. तुमच्या शब्दांनी परिस्थिती बिघडणार नाही याची काळजी घ्या.

**सिंह :** कुटुंबासोबत विशेषतः आई-वडिलांसोबत वेळ घालवाल. यामुळे नातेसंबंध अधिक मजबूत होतील. आर्थिक बाबतीत चढ-उतार दिसू शकतात. त्यामुळे खर्चावर नियंत्रण ठेवणे महत्त्वाचे आहे.

**कन्या :** आपल्या प्रियजनांसोबत वेळ घालवण्यासाठी आणि संवाद साधण्यासाठी हा एक उत्तम दिवस आहे. आज तुम्हाला आरोग्याच्या किरकोळ समस्या सतावतील. खाण्यापिण्याच्या सवयींवर नियंत्रण ठेवा.

**तुळ :** स्वतःच्या आरोग्याकडे आणि मानसिक स्थितीकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. आज तुम्हाला कामात भरपूर उत्साह जाणवेल. तुम्ही तुमच्या जबाबदाजया अत्यंत चांगल्या प्रकारे पार पाडाल.

**वृश्चिक :** आज तुमचा नोकरीचा शोध पूर्ण होईल. चांगलं काम मिळेल. महत्त्वाच्या कामात येणारे अडथळे दूर होतील. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजया लोकांना बाहेरच्या देशात जावे लागू शकते.

**धनु :** आज व्यवसायात चांगले उत्पन्न असल्याने आर्थिक स्थिती मजबूत असेल. पैशाच्या मदतीने काही महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील. यामुळे भविष्यात आर्थिक लाभ होतील.

**मकर :** कामाच्या ठिकाणी जास्त मेहनत करावी लागेल. सहकाजयांशी समन्वय साधण्याची गरज भासेल. कामाच्या ठिकाणी येणारे अडथळे कमी होतील. यामुळे नात्यात गोडवा येईल. उत्पन्नाचे स्रोत वाढतील.

**कुंभ :** आज तुमची आर्थिक परिस्थिती थोडी गडबडू शकते. त्यामुळे कोणत्याही मोठ्या निर्णयांमध्ये सावधगिरी बाळगा. सतत काम करण्याऐवजी छोटे ब्रेक घ्या. यामुळे तुमची कार्यक्षमता टिकून राहील.

**मीन :** आपल्या कामाचे संतुलन योग्य प्रकारे राखण्याचा प्रयत्न करा. करिअरमध्ये पुढे जाण्यासाठी विचारपूर्वक आणि रणनीती आखा. कोणताही निर्णय घाईघाईने घेऊ नका. आर्थिक स्थिती चांगली आणि मजबूत राहील.

महासागर
●गुरुवार,दि.१२ जून २०२५
अकोला
पान ६

## बच्चुभाऊच्या समर्थनार्थ बार्शीटाकळी तहसीलमध्ये कार्यकर्त्यांचे अर्धनग्न आंदोलन

**बार्शीटाकळी :** प्रहार चे सर्वेसर्वा बच्चुभाऊ कडू यांचे अन्न त्या आंदोलन सुरू असून शासनाने अजूनही त्या आंदोलनाची दखल घेतली नाही आज आंदोलनाला पाच दिवस झाले बच्चुभाऊ ची प्रकृती खालवत असल्याने प्रहार चे कार्यकर्ते सर्वत्र आक्रमक झाले असून बार्शीटाकळी येथील कार्यकर्त्यांनी तहसीलमध्ये अर्ध नग्न होऊन आंदोलन केले व बच्चू भाऊंच्या समर्थनार्थ शासनास निवेदन दिले यावेळी अनेक कार्यकर्त्यांना पोलिसांनी स्थानबद्ध केले होते.



### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते

# रेडवा (२ मे.वॅ.) आणि भेंडीमहाल (१० मे.वॅ.) सौर प्रकल्पांचे लोकार्पण

**■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अतंर्गत पूर्ण झालेल्या बार्शी टाकळी तालुक्यातील रेडवा (२ मेगावॅट) आणि भेंडीमहाल (१० मेगावॅट) या दोन सौर प्रकल्पाचे लोकार्पण,तेल्हारा तालुक्यातील मनात्री (१० मेगावॅट) आणि अकोट तालुक्यातील अकोलखेड (१० मेगावॅट) सौर प्रकल्पाचे भुमिपूजन आणि मुर्तिजापूर तालुक्यातील ३३ केव्ही हिवरा कोरडे आणि ३३ केव्ही पारद या दोन नविन उपकेंद्राचे भूमिपूजन मा. मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.



सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार रवींद्र चव्हाण, आमदार हरिष पिंपळे, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार किरण सरनाईक, आमदार श्याम खोडे, विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल, पोलीस महानिरीक्षक रामराव पोकळे, जिल्हाधिकारी अजित कुंभार, पोलिस अधिक्षक अर्जित चांडक, आदि मान्यवर उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी राज्य शासन सातत्याने कार्यरत असून शेतकऱ्यांना दिवसा आणि शाश्वत वीज पुरवठा करण्यासाठी असलेली शासनाची महत्वाकांक्षी योजना,मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना २.०,अंतर्गत राज्यात विकेंद्रीत सौर प्रकल्प उभारून १६ हजार मेगावॅट वीज निर्मिती करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पूर्ण झालेल्या बार्शी टाकळी तालुक्यात रेडवा सौर प्रकल्पाची क्षमता २ मेगावॅट आणि भेंडीमहाल सौर प्रकल्पातून १० मेगावॅट इतकी हरित ऊर्जा निर्माण होणार आहे.या दोन्ही प्रकल्पामुळे बार्शी टाकळी तालुक्यातील दगड पारवा,कान्हेरी,रेडवा,धाबा ,बार्शीटाकळी,पातुर नंदापूर,महान, महागाव,बहिरखेड,घोटा इत्यादी गावातील २ हजार ५९५ शेतकऱ्यांच्या कृषीपंपाना दिवसा आणि पुर्ण दाबाने वीज पुरवठा होणार आहे. मा.मुख्यमंत्री याच्याहस्ते भूमिपूजन करण्यात आलेल्या तेल्हारा तालुक्यातील मनात्री आणि अकोट तालुक्यातील अकोलखेड या दोन्ही सौर प्रकल्पाची क्षमता प्रत्येकी १० मेगावॅट एवढी असून या प्रकल्पामुळे परिसरातील १५०० शेतकऱ्यांना दिवसा विज उपलब्ध होणार आहे. जिल्ह्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत आजपर्यंत १० सौर प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले असून ५० मेगावॅट एवढी हिरत ऊर्जा निर्मिती होत आहे.तसेच या प्रकल्पामुळे जिल्ह्यातील १४ हजारापेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या कृषीपंपाना दिवसा वीजेची सोय झाली आहे. मा. मुख्यमंत्री देवेद्र फडणवीस यांच्याहस्ते मुर्तिजापूर तालुक्यातील ३३ केव्ही हिवरा कोरडे आणि ३३ केव्ही पारद, या दोन उपकेंद्राचे भूमिपूजन करण्यात आले.

### पातुर तालुक्यातील विवरा येथे

## युवकाचा मृत्यू खून की अपघात?

**■पातुर,दि ११ (प्रतिनिधी) :**

पातूर तालुक्यातील चांन्नी पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या वीवरा गावामध्ये एका युवकाचा चा जखमी अवस्थेत मृतदेह विवरा शिवारामध्ये आढळून आल्याने गावासह पातुर तालुक्यात एकच खळबळ उडाली आहेया घटनेची माहिती चांन्नी चे पोलिसांना मिळतात घटनास्थळावर पोलिसांनी धाव घेतली आहे मृतदेहाचा पंचनामा करून उत्तरिय तपासणी करता अकोला सर्वोच्च रुग्णालय येथे मृतब.देह पाठविण्यात आला आहे या घटने बाबत संकेत ठाणेदार श्री लांडे यांच्याशी चौकशी केली असता नी पोलिसात सद्यस्थितीत अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे यामध्ये सदर प्रकरणी तपास



चालू आहे उत्तरीय तपासणी नंतर याबाबत काय आहे ते कळेल अशी माहिती पोलीस सूत्रांकडून प्राप्त झाली आहे त्यामुळे या घटनेत खून की अकस्मात मृत्यू याबाबत चर्चा आहे.

## शिर्ला येथे वादळी वाऱ्याने बाभळीचे झाड पडून म्हैस ठार

**■पातुर,दि ११ (प्रतिनिधी) :**

शिर्ला गावात आज सायंकाळी अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे मोठे नुकसान झाले. या वादळात विठ्ठल भाकरे यांची एक म्हैस बाभळीचे झाड पडून जागीच दगावली. ही घटना सायंकाळी अंदाजे ५:३० वाजण्याच्या सुमारास घडली.

सायंकाळी अचानक आकाशात ढग दाटून आले आणि काही क्षणांतच कडाक्याच्या वाऱ्याने गावात धुमाकूळ घातला. जोरदार वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली, पत्रे उडाले आणि विजेच्या ताराही हलल्या. ग्रामस्थांमध्ये घबराट निर्माण झाली आणि नागरिकांनी सुरक्षित स्थळी धाव घेतली. बाभळीचे झाड जोरात पडल्याने त्याखाली दबून म्हैस जागीच ठार झाली. ही म्हैस त्यांच्यासाठी मुख्य उपजीविकेचा स्रोत होती. घटनेनंतर ग्रामस्थांनी तत्काळ प्रशासनाला माहिती दिली आणि महसूल





व पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.विठ्ठल भाकरे यांनी प्रशासनाकडे नुकसान भरपाईची मागणी केली आहे. ही म्हैस आमच्या कुटुंबाचा आधार होती. आम्हाला आर्थिक मदत मिळावी हीच अपेक्षा आहे, असे त्यांनी म्हटले.या वादळामुळे गावातील इतर ठिकाणी देखील झाडे पडली असून काही घरांच्या छतांचे नुकसान झाले आहे. सुदैवाने कोणतीही मानवी जीवितहानी झाल्याची नोंद नाही.प्रशासनाने लवकरात लवकर नुकसानग्रस्तांना मदतीचा हात द्यावा.

## मध्य रेल्वेच्या वतीने आषाढी वारीसाठी पंढरपूर / मिरज मार्गे विशेष गाड्या

**■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**

पंढरपूर येथे होणाऱ्या आषाढी वारी यात्रेच्या पार्श्वभूमीवर, ०१ जुलै २०२५ ते १० जुलै २०२५ दरम्यान यात्रेकरूंना सोयीसाठी मध्य रेल्वेकडून आषाढी विशेष गाड्या चालविण्यात येणार आहेत. गाड्यांचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत:१. नागपूर–मिरज विशेष गाड्या (४ फेऱ्या) गाडी क्र. ०१२०५ विशेष दिनांक ०४.०७.२०२५ व ०५.०७.२०२५ रोजी नागपूर येथून ०८.५० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी ११.५५ वाजता मिरज येथे पोहोचेल.

गाडी क्र. ०१२०६ विशेष दिनांक ०५.०७.२०२५ व ०६.०७.२०२५ रोजी मिरज येथून १२.५५ वाजता सुटून दुसऱ्या दिवशी १२.२५ वा. नागपूर येथे पोहोचेल.

थांबे: अजनी, वर्धा, पुलगाव, धामणगाव, चांदूर, बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, माळीपूर, भुसावळ, जळगाव, चाळीसगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहमदनगर, दौंड, कुर्डुवाडी, पंढरपूर, सांगोला, म्हसोबा डोंगरगाव, जाठ रोड, ढाळगाव, कवठे महांकाळ, सालगरे, आरग

रचना: २ एसी–३ टियर, १० स्लीपर, ४ सामान्य द्वितीय श्रेणी व २ दुसऱ्या श्रेणीच्या सामानवाहू व गार्ड ब्रेक व्हॅन्स२. न्यू अमरावती – पंढरपूर विशेष गाड्या (४ फेऱ्या) गाडी क्र. ०१११९ विशेष दिनांक ०२.०७.२०२५ व ०५.०७.२०२५ रोजी न्यू अमरावती येथून १४.४० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी ०९.१० वाजता पंढरपूर येथे



पोहोचेल.गाडी क्र. ०११२० विशेष दिनांक ०३.०७.२०२५ व ०६.०७.२०२५ रोजी पंढरपूर येथून १९.३० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी १२.५० वाजता न्यू अमरावती येथे पोहोचेल.थांबे: बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, जळंब, नांदुरा, माळीपूर, बोदवड, भुसावळ, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, नांदगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहमदनगर, दौंड, कुर्डुवाडरचना: २ एसी–३ टियर, १० स्लीपर, ४ सामान्य द्वितीय श्रेणी व २ दुसऱ्या श्रेणीच्या सामानवाहू व गार्ड ब्रेक व्हॅन्स३. खामगाव – पंढरपूर विशेष गाड्या (४ फेऱ्या) गाडी क्र. ०११२१ विशेष दिनांक ०३.०७.२०२५ व ०६.०७.२०२५ रोजी खामगाव येथून ११.३० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी ०३.३० वाजता पंढरपूर येथे पोहोचेल. गाडी क्र. ०११२२ विशेष दिनांक ०४.०७.२०२५ व ०७.०७.२०२५ रोजी पंढरपूर येथून ०५.०० वाजता सुटून १९.३० वाजता खामगाव येथे पोहोचेल.

थांबे: जळंब, नांदुरा, माळीपूर, बोदवड, भुसावळ, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, नांदगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहमदनगर, दौंड, कुर्डुवाडीरचना: २ एसी–३ टियर, १० स्लीपर, ४ सामान्य द्वितीय श्रेणी व २ दुसऱ्या श्रेणीच्या सामानवाहू व गार्ड ब्रेक व्हॅन्स४. भुसावळ – पंढरपूर अनारक्षित विशेष गाड्या (२ फेऱ्या) गाडी क्र. ०११५९ अनारक्षित विशेष दिनांक ०५.०७.२०२५ रोजी भुसावळ येथून १३.३० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी ०३.३० वाजता पंढरपूर येथे पोहोचेल. गाडी क्र. ०११६० अनारक्षित विशेष दिनांक ०६.०७.२०२५ रोजी पंढरपूर येथून २२.३० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी १३.०० वाजता भुसावळ येथे पोहोचेल.

थांबे: जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, नांदगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहमदनगर, दौंड, कुर्डुवाडीरचना: १६ सामान्य द्वितीय श्रेणी / स्लीपर डबे व २ दुसऱ्या श्रेणीच्या सामानवाहू व गार्ड ब्रेक व्हॅन्स

आरक्षण: विशेष शुल्कावर चालणाऱ्या गाड्या क्र. ०१२०५, ०१२०६, ०१११९, ०११२०, ०११२१ आणि ०११२२ या गाड्यांचे आरक्षण १६ जून २०२५ पासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर व www.irctc.co.in या संकेतस्थळावर सुरू होईल. अनारक्षित डब्यांचे तिकीट UTS मोबाईल ॲपवरून किंवा अनारक्षित तिकीट बुकिंग काऊंटरवरून सुपरफास्ट मेल/एक्सप्रेस दराने बुक करता येईल.अधिक माहितीसाठी www.enquiry.indianrail.gov.in किंवा NTES ॲप डाउनलोड करा.

## महापालिकेचा ४ सदस्यीय प्रभाग

**■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**

महापालिका प्रशासनाला प्रभाग रचना करण्याचे निर्देश राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने दिले आहेत. त्या अनुषंगाने पूर्वीप्रमाणेच अकोला महापालिकेचा चार सदस्यीय प्रभाग कायम राहणार आहे. शासनाने सदर आदेश जारी केल्याने एकप्रकारे आता महापालिकेच्या निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. त्यानुसार महापालिका प्रशासन प्रभाग रचनेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करणार आहे.मार्च – २०२२ मध्ये नगरसेवकांचा संपुष्टात – आला होता. त्यानंतर महापालिकेत प्रशासकीय राजवट सुरू झाली होती. गेल्या ८ सप्टेंबर २०२२ रोजी महापालिकेमध्ये अकोला निवडून द्यावयाच्या सदस्यांची किमान व कमाल संख्या जनहित निश्चित करण्यात आलेली आहे.

त्यानुसार महापालिका प्रशासनाने २०२३ मध्ये – निवडणुकीची प्रभाग रचना प्रक्रिया होती. परंतु, ५ तेव्हा ओबीसी आरक्षणाचा प्रश्न सवीच्च १ न्यायालयात न्यायप्रविष्ट होता. त्यानंतर न सवीच्च न्यायालयाने ६ मे २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तत्काळ घेण्याचे आदेश दिले. जनगणना कार्यालयाने प्रसिध्द केलेली लगतच्या जनगणनेनुसार महानगरपालिका क्षेत्राची प्रगणक गटनिहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जातीची व अनुसूचित जमातीची लोकसंख्या, प्रगणक गटाचे नकाशे व घरयादी जनगणना कार्यालयाकडून उपलब्ध करून घ्यावी. प्रभाग रचना ही फक्त लगतच्या जनगणनेच्या लोकसंख्येच्या आधारे केली जाते, म्हणून त्या क्षेत्रातील मतदार संख्या अथवा सध्याची रहिवाशांची संख्या विचारात घेता येत नाही व याचा प्रभाग रचनेशी कसलाही संबंध येत नाही. यापूर्वी प्रभाग रचना चारची तर सदस्य संख्या ८० होती. नव्याने प्रभागांची संख्या वाढणार असून, २० ऐवजी आता २३ प्रभागांची रचना होणार असून, ८० ऐवजी नगरसेवकांची संख्या ९१ होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यानुसार महापालिका प्रशासन आगामी दिवसांत २० किंवा २३ प्रभागांची रचना करणार याबाबतचे चित्र स्पष्ट होणार आहे. नगर विकास विभागाचे आदेश धडकले महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ५ मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेची एकूण सदस्य संख्या निश्चित करताना क्षेत्रातील जनगणनेतील लोकसंख्येच्या आधारावर परिशिष्ट १ नुसार महापालिकेच्या एकूण सदस्य संख्येची परिगणना करण्यात यावी. यानुसार परिगणना करताना महाराष्ट्र अधिनियम ८ सप्टेंबर २०२२ अनुसार सदस्य संख्या विचारात घेण्याचे म्हटले आहे.

सर्वच प्रभाग चार सदस्यांचे होत नसल्यास एक प्रभाग तीन अथवा ५ सदस्यांचा होईल अथवा दोन प्रभाग ३ सदस्यांचे होतील. असे ३ अथवा ५ सदस्यांचे प्रभाग कोणत्या क्षेत्रात राहतील हे भौगोलिक सलगता राखण्याच्त्या दृष्टीने प्रभाग रचना करताना नागरिकांची गैरसोय टाळता येईल अशा ठिकाणी ठेवण्यात यावेत. याकरिता प्रत्यक्ष प्रभाग रचना करण्याबाबतचे इतर निकषदेखील विचारात घ्यावेत.

## तेल्हारा पोलिसांची ठिकठिकाणी छापेमारी

तेल्हारा : तेल्हारा पोलिस स्टेशन अंतर्गत वडगाव रोठे व पाथर्डी येथे पोलिसांनी ९ जून रोजी एकाच दिवशी वेगवेगळ्या वेळी छापेमारी केली. यात अवैध व विनापरवाना देशी दारूची विक्री करणाऱ्या आरोपींविरुद्ध कारवाई करून गुन्हे दाखल केले आहेत.

## अकोला कृषि विद्यापीठाच्या रा से यो स्वयंसेवकांनी गाजविली विदर्भ स्तरीय पाणी परिषद!

**■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना आणि जनकल्याणकारी समिती यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथे आयोजित तीन दिवसीय विदर्भस्तरीय पाणी परिषद सर्वार्थाने फलदायी ठरली. सदर परिषदेत डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोलाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या यूनिटने उत्कृष्ट प्रदर्शन एक प्रकारे विद्यापीठाचा लौकिकच वाढविला. परिषदेदरम्यान आयोजित रील मेकिंग कॉम्पिटिशन मध्ये, कृषी महाविद्यालय दारव्हा, यानी दुसरे क्रमांकचे पारितोषिक पटकविले.

तर श्री शिवाजी कृषी महाविद्यालय अमरावती याना उत्तेजनार्थ प्रथम क्रमांक आणि वसुधाताई देशमुख कृषी महाविद्यालय बोडना अमरावती याना उत्तेजनार्थ दूसरा क्रमांक मिळवला.पोस्टर मेकिंग कॉम्पिटिशन मध्ये श्री शिवाजी




कृषी महाविद्यालय अमरावतीने उत्तेजनार्थ प्रथम क्रमांक पटकावले, तर मॉडेल मेकिंग कॉम्पिटिशन मध्ये श्री शिवाजी कृषी महाविद्यालय अमरावतीने तिसरा क्रमांक मिळवला असुन, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यानी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना शाबासकी देतं कौतुक केले. तर कार्यक्रमाच्या या यशस्वी आयोजनात डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे अधिष्ठाता (कृषी) डॉ. श्यामसुंदर माने, विद्यार्थी कल्याण अधिकारी व विद्यापीठ समन्वयक डॉ. संदिप हाडोळे, यांच्याकडून प्रोत्साहन व शुभेच्छा मिळाल्या. एन एस एस यूनिट सोबत सहभागी झालेले विदर्भ पाणी परिषद चे एन एस एस यूनिट टीम मैनेजर डॉ. हर्षवर्धन देशमुख, डॉ. मंजुषा देशमुख, प्रोग्राम ऑफिसर डॉ स्वाती देशमुख, डॉ. दीपक पाडेकर, आणि श्री. वैभव देशमुख यांच्याकडून मार्गदर्शन व सहकार्य प्रोत्साहन मिळाले.

## पोलीस प्रशिक्षणार्थ्यांचा दीक्षांत संचलन समारंभ

**■अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**

पोलीस प्रशिक्षण केंद्र येथील सत्र क्रमांक ६६ मधील ५३१ पैकी ५२० प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई यांचे दि. १९/०९/२०२४ पासून सुरु झालेले पोलीस शिपाई पदाचे मुलभूत प्रशिक्षण पूर्ण झाले त्यांचा दीक्षांत संचलन समारंभ ९ जून रोजी रोजी अमरावती विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. सत्र क्रमांक ६६ मधील पोलीस प्रशिक्षणार्थी यांनी दीक्षांत संचलन समारंभा दरम्यान परेड कमांडर, प्रशिक्षणार्थी रोल नंबर ४६१ सारगंधर गोविंद आकमार मुळ घटक जालना यांचे नेतृत्वात शिस्तबध्द व उत्कृष्ट कवायत संचलन सादर केले. अकोल्याच्या प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य डॉ. निलेश पांडे यांनी आपल्या अहवाल वाचन केले तसेच प्रमुख अतिथीनी आपल्या भाषणात प्रशिक्षणार्थीचे अभिनंदन करुन प्रशिक्षणार्थीनी प्रशिक्षण केंद्रामध्ये प्राप्त केलेल्या ज्ञानाचा पुर्णपणे वापर करुन जनतेस सेवा द्यावी, आदर्श माणुस व आदर्श पोलीस म्हणुन नावलौकीक मिळवावा. कायदयाचा योग्य वापर करावा कायद्याचे अद्यावत ज्ञान तसेच सी.सी.टी.एन.एस प्रणालीचे ज्ञान आत्मसात करुन त्याचा आपल्या काम काजात अचुक वापर करण्याबाबत मार्गदर्शन केले. दीक्षांत संचलन समारंभाचे वेळी अंतिम परीक्षेत सर्वाधिक गुण घेवून सर्वप्रथम आलेला सर्वोत्कृष्ट प्रशिक्षणार्थी रोल नंबर ८६ अंकित सुरेश ठाकरे, मुळ घटक अमरावती ग्रामीण यांचेसह आंतरवर्ग व बाहयवर्ग प्रशिक्षणात व गोळीबार, कमांडो, परेड मध्ये प्राविण्य संपादन केलेल्या प्रशिक्षणार्थीना प्रमुख अतिथीच्या हस्ते पुरस्कार देवून गौरविण्यात आले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य, डॉ. निलेश पांडे यांचे मार्गदर्शना खाली सत्र संचालक तथा प्रभारी उपप्राचार्य श्री. आधारसिंग सोनोने, राखीव पोलीस निरीक्षक, महादेव मधुकर खंडारे, कार्यालय अधीक्षक श्री विनोद धारस्कर, प्रमुख लिपीक, श्री. भरत मसराम, प्रशिक्षण लिपीक वरिष्ठ श्रेणी लिपीक श्री सुनिल लास्कर व मंत्रालयीन कर्मचारी यांचेसह प्रशिक्षण केंद्रातील सर्व आंतरवर्ग व वाहयवर्ग अधिकारी, अंमलदार यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन विधी निदेशक श्री दिपक भुतडा, रापोनि श्री अजय शेवाळे यांनी केले तसेच आभार प्रदर्शन प्रशिक्षण केंद्राचे प्र.उपप्राचार्य श्री आधारसिंग सोनोने यांनी केले. सदर कार्यक्रमास शहरातील मान्यवर अतिथी, गणमान्य नागरिक, प्रशिक्षणार्थीचे पालक व नातेवाईक, सेवानिवृत्त अधिकारी/अंमलदार, पत्रकार, वृत्त वाहिन्यांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यापूर्वी विरोधक पोलिसांच्या ताब्यात

**अकोला :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आजच्या अकोला दौऱ्यापूर्वीच राजकीय वातावरण तापले आहे. पोलिस प्रशासनाने प्रतिबंधात्मक कारवाई करत उध्दव ठाकरे गटाचे शिवसेना नेते राजेश मिश्रा आणि प्रहार संघटनेचे मनोज पाटील यांना ताब्यात घेतले आहे. यामुळे राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली आहे.

राजेश मिश्रा हे राजेश्वर मंदिरात दर्शनासाठी गेले असताना पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्याला कोणताही विरोध होऊ नये यासाठी ही कारवाई करण्यात आल्याचे बोलले जात आहे.

## पातुर आयुर्वेद महाविद्यालयात विद्यापीठ वर्धापन दिन संपन्न



**■पातुर,दि ११ (प्रतिनिधी) :**

नाशिक आरोग्य विज्ञान विद्यापीठा चा २७ वा वर्धापन दिन पातुर येथे आमदार डॉ. राहुल पाटील शैक्षणिक संकुलात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. जयश्री काटोले यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयाचे संचालक डॉ.साजिद शेख,उपप्राचार्य डॉ.अभय भुस्कडे व धनंजय मिश्रा प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी १९९८ सालात स्थापन झालेल्या विद्यापीठाच्या कार्याची माहिती मान्यवरांनी आपल्या मनोगतातून दिली,विद्यापीठाने केलेल्या कार्याचा गौरव यावेळी सर्वांनी केला. नाशिकचे विद्यापीठ आरोग्य क्षेत्रात मैलाचा दगड ठरले आहे अशा भावना सर्वांनी व्यक्त केल्या.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम खोले फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)



# 'हाऊसफुल ५' १०० कोटींच्या क्लबमध्ये?

२०२५ हे वर्ष बॉलीवूड अभिनेता अक्षय कुमारसाठी लाभदायी ठरले आहे. या वर्षी त्याचा तिसरा चित्रपट प्रेक्षकांकडून खूप प्रेम मिळवत असल्याचे दिसून येत आहे. साजिद नाडियाडवालाचा हिट फ्रँचायझी चित्रपट 'हाऊसफुल ५' अलिकडेच प्रदर्शित झाला. यावेळी नाडियाडवालाने चित्रपटाला सर्वोत्कृष्ट बनवण्यात कोणतीही कसर सोडलेली नाही. चित्रपट वेगवेगळ्या क्लायमॅक्ससह प्रदर्शित झाला. रिलीज होण्यापूर्वीच त्याबद्दल बरीच चर्चा होती. यात अक्षय कुमार, अभिषेक बच्चन आणि रितेश देशमुख यांच्यासह अनेक प्रसिद्ध चेहरे आहेत. चित्रपटाला आयएमडीकडून ४.० रेटिंग मिळाले. सुरुवातीला प्रेक्षकांकडून संमिश्र प्रतिसाद मिळाला. पण आता तो प्रेक्षकांना आकर्षित करण्यात यशस्वी होताना दिसत आहे. 'हाऊसफुल'च्या या पाचव्या भागात अनेक खास गोष्टी पाहायला मिळत असून मागील भागातील काही दृश्ये 'हाऊसफुल ५' मध्ये दाखवण्यात आली आहेत. यामुळे कथेत एक कनेक्शन दिसते. बॉबी देओलच्या प्रवेशाने थिएटरमध्ये लोक आश्चर्यचकित होतात. तो चित्रपटाच्या क्लायमॅक्समध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो कारण आणि त्याच्या एका घोषणेने जहाजावर उपस्थित असणाऱ्या सर्व लोकांचे नशीब उजळते. अर्थात चित्रपटाच्या कथेची आणि सस्पेन्सची माहिती तुम्हाला 'हाऊसफुल ५' पाहिल्यानंतरच मिळेल.

अक्षय कुमारच्या या चित्रपटाने पहिल्या दिवशी भारतात २४ कोटींचा गल्ला जमवला. शनिवारी कलेक्शन वाढले आणि हा आकडा ३१ कोटींवर पोहोचला. रविवारीही त्याने चांगली कामगिरी केली. यानंतर हा चित्रपट आता १०० कोटींच्या अगदी जवळ पोहोचला आहे.






# ...मग ही तर पर्वणीच

'बाहुबली' आणि 'आरआरआर' सारख्या सुपरहिट चित्रपटांनंतर आता चाहते एसएस राजामौलीच्या पुढच्या चित्रपटाची वाट पाहत आहेत. सध्या ते महेश बाबू आणि प्रियांका चोप्रा यांच्यासोबत एक जंगल ॲडव्हेंचर बनवत आहे. ताजी बातमी म्हणजे यात 'रहना है तेरे दिल में' फेम अभिनेता आर माधवनचा प्रवेश निश्चित झाला आहे.

आर माधवन या १,००० कोटींच्या महाकाव्यात्मक चित्रपटात अत्यंत मजबूत भूमिका साकारू शकतो, असे म्हटले जात आहे. तथापि, निर्मात्यांनी अद्याप याची पुष्टी केलेली नाही. पृथ्वीराज सुकुमारन देखील या चित्रपटात आहे. तेव्हा माधवन यात दिसला तर राजामौली आणि माधवन एकत्र काम करण्याची ही पहिलीच वेळ असेल. स्वाभाविकच प्रेक्षक या पर्वणीची वाट पहात आहेत.

राजमौली यांच्या या बहुचर्चित चित्रपटाबद्दल प्रचंड उत्सुकता असली तरी त्याबद्दल सर्व काही अतिशय गुप्त ठेवले जात आहे. हा एक ॲक्शन–ॲडव्हेंचरपट असेल, एवढीच माहिती समोर येत आहे. राजामौली यांनी २०२४ मध्येच केनियामध्ये एक लोकेशन पाहून ठेवले होते. कदाचित आता या चित्रपटाचा काही भाग तेथे शूट केला जाऊ शकतो. या चित्रपटाचे संगीत एमएम कीरावानी यांच्या हाती आहे. यापूर्वी त्यांनी 'आरआरआर' मधील 'नाटू नाटू' साठी ऑस्कर जिंकला आहे.

या व्यतिरिक्त आर. माधवन 'आप जैसा कोई' या प्रोजेक्टवर देखील काम करत आहे. यामध्ये फातिमा सना शेख त्याच्यासोबत पडदा शेअर करत आहे. हा चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे. तेव्हा आर. माधवन यांच्या चाहत्यांसाठी ही आनंदाची बाब ठरु शकते.

# वाद चिघळला आणि...

दक्षिणेतील सुपरस्टार कमल हासन यांचा बहुप्रतिक्षित 'ठग लाईफ' देशभरात प्रदर्शित झाला असला तरी वादांमुळे तो कर्नाटकात प्रदर्शित होऊ शकलेला नाही. या चित्रपटाला कर्नाटकात मोठ्या प्रमाणात निषेध नोंदवला गेला. पुढे तो इतका वाढला की थिएटर मालकांना धमक्या येऊ लागल्या. परिस्थितीचे गांभीर्य पाहून कर्नाटक थिएटर असोसिएशनने सुरक्षेची मागणी करत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. परंतु न्यायालयाने त्यावर त्वरित सुनावणी घेण्यास नकार दिला. त्यामुळेच ही बाब सध्या चांगलीच चर्चेत आहे. सिनेमागृहांना सुरक्षा प्रदान करण्याची मागणी मान्य झाली असती तर चित्रपटाचे सुरक्षित प्रदर्शन शक्य झाले असते. मात्र तसे न झाल्याने मोठा फटका सहन करावा लागत आहे, असे म्हणावे लागेल.

या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठाने तात्काळ दिलासा देण्यास नकार दिला आणि याचिकाकर्त्यांना प्रथम कर्नाटक उच्च न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला. 'तुम्ही प्रथम राज्याच्या उच्च न्यायालयाशी संपर्क साधावा. आम्ही या प्रकरणात त्वरित हस्तक्षेप करू शकत नाही...' असे मत त्यांनी व्यक्त केले.

'ठग लाईफ' वरील हा वाद कसा सुरू झाला हे वाचक जाणतात. कमल हासन यांनी चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान कन्नड भाषेबद्दल आक्षेपार्ह टिप्पणी केली, आणि तेव्हापासून हा मुद्दा चिघळला. या टिप्पणीनंतर कर्नाटकात त्यांच्या विरोधात निदर्शने सुरू झाली आणि अनेक संघटनांनी त्यांच्या चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी घालण्याची मागणी केली. या प्रकरणी अभिनेत्याला माफी मागण्यास सांगण्यात आले होते, परंतु त्यांनी माफी मागितली नाही. त्यामुळे कर्नाटकात त्यावर बंदी घालण्यात आली. त्याचमुळेच कमल हासन यांचा हा चित्रपट पाच जून रोजी देशभरात प्रदर्शित झाला असला तरी कर्नाटकातील प्रेक्षकांपुढे तो येऊ शकलेला नाही.




# कसा असेल 'अखंड २'

नंदमुरी बालकृष्ण आगामी चित्रपटांमुळे सध्या चांगलेच चर्चेत आहेत. काही हिट चित्रपटांच्या सिक्वेलची सर्वांनाच उत्सुकता आहे. त्यांचा 'अखंड' २०२१ मध्ये प्रदर्शित झाला होता. प्रेक्षकांना त्यांचे काम खूप आवडले होते. आता ते त्याच्या सिक्वेलने सर्वांचे मन जिंकण्यास सज्ज आहेत. 'अखंड २' प्रदर्शित होण्यासाठी सज्ज असून निर्मात्यांनी टीझर रिलीज करून सगळ्यांनाच आश्चर्यचकित केले आहे.

ज्येष्ठ तेलुगू अभिनेता नंदमुरी बालकृष्ण आणि दिग्दर्शक बोयापती श्रीनु यांनी 'अखंड २' साठी पुन्हा एकदा हातमिळवणी केली आहे. यापूर्वी दोघांनीही तीनदा प्रोजेक्टवर काम केले आहे. अशातच त्यांच्या आगामी चित्रपटाचा अद्भुत टीझर रिलीज झाला आहे.

'अखंड २' ची निर्मिती राम अचंता आणि गीपचंद अचंता यांनी केली आहे. प्रदर्शित झालेल्या टीझरमध्ये बालकृष्ण पूर्णपणे नवीन अवतारात दिसत असून त्यामध्ये आध्यात्मिक प्रतिमेसह जोरदार ॲक्शन दिसून येते. यामध्येही त्यांचे पात्र पहिल्या भागात होते तसेच दिसले आहे. टीझर पाहिल्यानंतर सोशल मीडियावरील वापरकर्त्यांनी भरघोस प्रतिक्रिया दिल्या असून अभिनेत्याच्या कामाचे कौतुकही केले आहे.



'अखंड २' चा टीझर पाहिल्यानंतर, चित्रपटप्रेमींमध्ये याबद्दलची उत्सुकता वाढली आहे. नंदमुरीच्या चाहत्यांनीही टीझरला पसंती देण्यास सुरुवात केली आहे. रिलीज तारखेबद्दल बोलायचे झाले तर प्रेक्षकांना चित्रपटासाठी जास्त वाट पाहावी लागणार नाही. हा चित्रपट २५ सप्टेंबर २०२५ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. त्याच्या पहिल्या भागाबद्दल बोलायचे तर 'अखंड' ने बॉक्स ऑफिसवर १०० कोटींहून अधिक कमाई केली होती. आता त्याचा सिक्वेल कशी कामगिरी करतो हे पाहणे मनोरंजक असेल.

# हिनाचे हात मेहंदीने सजले

'ये रिश्ता क्या कहलाता है' मधील 'अक्षरा' म्हणजेच हिना खानने प्रियकर रॉकी जयस्वालशी अचानक लग्न करून सर्वांनाच आश्चर्यचकित केले. तिने रॉकीबरोबर साधेपणाने आणि कोणत्याही डामडौलाशिवाय लग्न केले असले तरी त्यांची झलक सोशल मीडियावर प्रचंड वेगाने पसरली.

हिना खान आणि रॉकी जयस्वाल हे लोकप्रिय टीव्ही जोडपे आहे. दोघांनीही नेहमीच परस्परांमधील नाते सार्वजनिकरित्या स्वीकारले आहे. पण ते अचानक आणि इतक्या साध्या पद्धतीने लग्न करतील असे कोणालाही वाटले नव्हते. मात्र त्यांनी अगदी साध्या पद्धतीने लग्न केले. इतकेच नाही तर या अभिनेत्रीने लग्नाचा लूकही अगदी मिनिमलिस्ट ठेवला होता.




मात्र आता तिने लग्नाचा लूक मिनिमलिस्ट का ठेवला हे सांगितले. तिने लग्नाचे नवीन फोटो शेअर केले असून त्यात ती खूप सुंदर दिसते. तिने लग्नाच्या दुपट्ट्यावर 'हिना आणि रॉकी' असे लिहिलेले दाखवले आहे. हे फोटो शेअर करताना हिनाने लेहेंगा, भारी दागिने आणि भारी मेकअपऐवजी लग्नाचा साधा लूक का निवडला हे सांगितले. तिने कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, या सुंदर दिवशी मी मिनिमलिस्ट राहायला हवे होते तितके राहू शकले, याचा आनंद आहे. कोणताही हेवी लेहेंगा नाही, जास्त मेकअप नाही किंवा जड दागिने नाहीत, मोठी केशरचना नाही किंवा जास्त ॲक्सेसरीजही नाहीत. मला यापैकी काहीही करण्याची गरज नव्हती कारण मी आतून समाधानी होते. माझ्यासाठी तेवढेच महत्त्वाचे होते...!

हिना खानने लग्नात मनीष मल्होत्राने डिझाइन केलेली ओपल ग्रीन रॉ सिल्क साडी नेसली होती. त्यामध्ये ती कमालीची सुंदर दिसत होती. तिच्या लूकला कमीत कमी दागिन्यांनी स्टाईल केले गेले होते. रॉकीने मनीष मल्होत्राने डिझाइन केलेला ऑफ व्हाइट कुर्ता–पायजमा घातला होता.

# थोडी वाट बघा

बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री नीना गुप्ता आपल्या वाढदिवसाच्या जंगी पार्टीमुळे, त्यातील पेहरावामुळे प्रकाशझोतात राहिल्या. यात मुलगीही मागे नाही. डिझायनर मसाबा गुप्ता नुकतीच आई झाली आहे. काही महिन्यांपूर्वी तिने पहिल्या मुलाचे स्वागत केले. पण आता दुसऱ्या गरोदरपणाच्या बातमीमुळे पुन्हा एकदा तिच्याबाबत चर्चा होत आहे. अलीकडेच तिचा एक व्हिडिओ व्हायरल झाला असून ती गरोदर असल्याच्या अटकळींना उधाण आले आहे. चाहत्यांपासून माध्यमांपर्यंत सर्वजण मसाबा गुप्ता पुन्हा आई होणार आहे का? हा एकच प्रश्न विचारत आहेत.

नुकतेच सोनम कपूरने तिच्या ४० व्या वाढदिवसानिमित्त एका पार्टीचे आयोजन केले होते. त्यावेळी बॉलिवूड आणि फॅशन इंडस्ट्रीतील अनेक प्रसिद्ध व्यक्ती उपस्थित होत्या. करीना कपूर, जान्हवी कपूर,



शिल्पा शेट्टी आणि इतर मोठ्या स्टार्सबरोबर मसाबा गुप्ता देखील पती सत्यदीप मिश्रासोबत पार्टीला पोहोचली होती. हे जोडपे पार्टीतून बाहेर पडले आणि त्यांनी पापाराझींसमोर पोज दिली तेव्हा लोकांचे लक्ष मसाबाच्या लूककडे गेले. त्यानंतर ती पुन्हा एकदा आई होणार असल्याची बातमी पसरली.

पार्टीत मसाबाने काळ्या रंगाचा बॉडीकॉन ड्रेस घातला होता आणि त्यावर सुंदरसे जॅकेट देखील घातले होते. मात्र या पोशाखात तिचे पोट थोडे मोठे दिसत होते. ते पाहून अनेकांनी ती दुसऱ्यांदा गर्भवती असल्याचा अंदाज बांधला. व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होताच मसाबाच्या गरोदरपणाबद्दल बोलले जाऊ लागले. काही वापरकर्त्यांनी तिचे थेट अभिनंदन करण्यास सुरुवात केली तर काहींनी याला केवळ गैरसमज म्हटले. तथापि, आतापर्यंत मसाबा किंवा तिच्या कुटुंबाकडून या विषयावर कोणतेही अधिकृत विधान आलेले नाही. त्यामुळे चाहत्यांनी आनंदाच्या बातमीसाठी थोडी वाट पहावी हे उत्तम.

# नावात बदल?

विवेक अग्निहोत्री चित्रपटांमधून महत्त्वाचे विषय मांडण्यासाठी ओळखले जातात. 'द काश्मीर फाइल्स'च्या यशानंतर त्यांना असे अनेक चित्रपट बनवण्याची संधी मिळाली असून सध्या ते 'दिल्ली फाइल्स'वर काम करत आहेत. मध्यंतरी याची घोषणा करण्यात आली होती. पण आता चर्चा आहे की, अग्निहोत्री यांच्या आगामी चित्रपटाचे नाव पूर्वी सांगितलेल्या नावासारखे नसेल.

'द ताश्कंद फाइल्स' आणि 'द काश्मीर फाइल्स' सारख्या चित्रपटांसाठी प्रसिद्ध असणारे हे चित्रपट निर्माते आता चित्रपटाचे नाव बदलण्याची योजना आखत आहेत. मग प्रश्न असा उद्भवतो की, सर्व गोष्टी निश्चित झाल्यानंतर चित्रपटाचे शीर्षक बदलण्याची गरज का पडली? हा प्रश्न अद्याप तरी अनुत्तरित आहे.


विवेक अग्निहोत्री यांना पुढील चित्रपटाचे नाव 'द बंगाल फाइल्स' असे ठेवता येईल. यामागील कारण म्हणजे चित्रपटाची संपूर्ण कथा बंगालच्या इतिहासावर आधारित असणार आहे. अशा परिस्थितीत दिल्लीचे नाव कथेशी जुळणार नाही. विवेक अग्निहोत्री यांनी नुकतेच त्यांच्या इंस्टाग्राम स्टोरीवर एक फोटो शेअर केला आणि लिहिले की, 'तुम्हापैकी अनेकांनी 'द दिल्ली फाइल्स' किंवा 'द बंगाल फाइल्स' या नावावर प्रतिक्रिया शेअर केली आहे. मात्र आता माझ्याकडे एक मोठी अपडेट आहे, पण मी आत्ता त्याबद्दल माहिती देणार नाही. त्यासाठी तुम्ही वाट पाहा.'

या चित्रपटाचा टीझर आधीच प्रदर्शित झाला आहे. त्यात बंगालमधील एक दुखद घटना दाखवण्यात आली आहे. चित्रपटात मुख्य भूमिका साकारणारा अभिनेता मिथुन चक्रवर्तींची झलकही त्यात पाहायला मिळते. हा अभिनेता जळलेल्या जिभेने भारतीय संविधानाची प्रस्तावना वाचत असल्याचे टीझरमध्ये बघायला मिळाले. यावरूनच त्याला काही वेदनादायक घटनांना सामोरे जावे लागले आहे, हे स्पष्ट होते. चित्रपटाच्या प्रदर्शन तारखेबद्दल बोलताना, निर्मात्यांनी २०२५ च्या अखेरीस तो मोठ्या पडद्यावर आणण्याची योजना आखली असल्याचे स्पष्ट केले. त्यात अनुपम खेर आणि पल्लवी जोशी मुख्य भूमिकेत दिसतील. मात्र सध्या सर्वांना अग्निहोत्रींच्या नावाच्या घोषणेची उत्सुकता आहे.



# येतो आहे 'बिग बॉस १९'

चाहते टीव्हीवरील लोकप्रिय रिॲलिटी शो 'बिग बॉस'च्या नवीन सीझनची आतुरतेने वाट पाहत आहेत. 'बिग बॉस' चाहत्यांना होस्ट म्हणून सलमान खान खूप आवडतो. एकंदरच सध्या 'बिग बॉस १९' बद्दल चर्चा सुरू असून तो आतापर्यंतचा सर्वात मोठा सीझन असेल असे म्हटले जात आहे. हा शो सुमारे पाच महिने चालेल. निर्मात्यांनी स्पर्धकांशी संपर्क साधण्यास सुरुवात केली आहे. अपडेट असे की, निर्मात्यांनी शोसाठी एका प्रसिद्ध युट्यूबरशी संपर्क साधला आहे.




'बिग बॉस १९' बद्दल सुरुवातीला सोशल मीडियावर म्हटले जात होते की यावेळी कोणत्याही युट्यूबर किंवा सोशल मीडिया स्टार्सशी संपर्क साधला जाणार नाही. तथापि, आता दिसते की ती फक्त अफवाच होती कारण एका प्रभावशाली व्यक्तीचे नाव सतत या शो शी जोडले जात आहे. मुख्य म्हणजे तो तुरुंगवास आणि घटस्फोटामुळे चर्चेत राहिलेला आहे.

'बिग बॉस' च्या इंस्टाग्राम पोस्टनुसार, सलमान खानच्या या शोसाठी 'फ्लाइंग बीस्ट' नावाचे चॅनल चालवणाऱ्या युट्यूबरला ऑफर देण्यात आली आहे. तो कधीकधी घटस्फोटाच्या अफवांमुळे चर्चेत येतो तर कधी अन्य एखाद्या कारणासाठी त्याच्या नावाची चर्चा असते. एकदा तर तो वाढदिवस साजरा करण्यासाठी तुरुंगात गेला होता. तर हा युट्यूबर दुसरा तिसरा कोणी नसून गौरव तनेजा आहे. त्यालाच 'बिग बॉस' ची ऑफर देण्यात आली आहे. तथापि, अद्याप यासंबंधीची कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही.

